

# श्री साईलीला

श्रीरामनवमी विशेषांक




द्वारकामाईतील श्रीसाईबाबा





एप्रिल ] किं. ८० पैसे [ १९७९



मुंबापुरीतील एक प्रसिद्ध साईभक्त श्री. डी. के. जाधवमास्तर यांनी आपल्या बांद्रा येथील निवासस्थानी असलेल्या श्रीसाईबाबांच्या टोलेजंगी मूर्तीसमोर एका सुंदर संगमरवरी नंदीची प्रतिष्ठापना महाशिवरात्रीचे दिवशी ठाण्याचे प्रख्यात संत श्री. अण्णासाहेब पट्टेकर महाराज यांच्या शुभहस्ते केली. चित्रात महाराजांचे पाठीमागे श्री. जाधवमास्तर व त्यांची नात कु. गौरी.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥



## श्रीसाई वाक्सुधा

निजहित साधावयाची कामना ।
असेल जया सभाग्याच्या मना ।
तयानें साई कथा निरूपणा ।
सादर श्रवणा असावें ॥ ४ ॥

संत महिमा अपरंपार ।
कवणा न वर्णवे साचार ।
तेथें काय माझा अधिकार ।
जाणीव साचार ही मजला ॥ ५ ॥

इतुक्या पुरे वक्त्याचें मीपण ।
साई लाघवी घेऊनि आपण ।
कोणाही करवीं निजगुण कथन ।
करवी श्रवण निजभक्तां ॥ ६ ॥

तो हा परात्पर सरोवर हंस ।
हंसः सोहं वृत्ति – उदास ।
ब्रह्म – मुक्तसेवनोल्लास ।
असमासाहस जयास ॥ ७ ॥

जया नसतां नांव गांव ।
अंगी अपरंपार वैभव ।
क्षणें करील रंकाचा राव ।
भृकुटी लाघवं हें ज्याचें ॥ ८ ॥

–श्रीसाईसच्चरित् अध्याय २६ वा

# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५८ वे ] एप्रिल १९७९ [ अं. १

: संपादक :

श्री. क. ही. काकरे,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं ८०४–बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३२ ६१

# अनुक्रमणिका – एप्रिल १९७९


| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | — | रामनवमी |
| २) श्रीसाई–एक अवतार | — | श्री. अनंतराव चितांबर |
| ३) श्रीराम जयराम जयजयराम | — | श्री. द. शं. टिपणीस |
| ४) भगवन्नाम | — | श्री. रमाकांत पंडित |
| ५) महानयोगी | — | श्री. ग. गो. सामंत |
| ६) साई उदी आणि साई तीर्थ | — | श्री. आर. डी. नायक |
| ७) आईची काळजी लेकरासाठीच | — | श्री. सूर्यकांत गर्जे |
| ८) इच्छापूर्ती | — | सौ. उषा अधिकारी |
| ९) श्रीसाई भक्ती प्रभाव | — | श्री. पांडुरंग भुजबळ |
| १०) जब केवटसे केवटने चरण धुलवाये | — | डॉ. अनिल जायस्वाल |
| ११) साईभक्तांना निमंत्रण | — | — |
| १२) साईपूजा | — | सौ. वैशाली हिंदळेकर |
| १३) चरणी ठेवितो माथा | — | श्री. रामचंद्र गुप्ते |
| १४) आस, तीर्थ | — | श्री. रमेश भावसार |
| १५) श्रीबाबांचे वर्णन, साईकृपा | — | श्री. एन. आर. देशपांडे |
| १६) श्रीसाईंची प्रभावी उदी | — | श्री. बाळकृष्ण गोरक्षकर |
| १७) शिरडीवृत्त | — | — |
| १८) शिरडीतील नेत्रदान शिबिर | — | — |

## संपादकीय –

स. न. वि. वि.

### – रामनवमी –

श्रीसाईबाबांच्या साठाव्या पुण्यतिथीच्या निमित्याने आम्ही सबंध वर्षभरात तेरा खास अंक काढून ते साईवाचकांच्या हाती देण्याची कल्पना आखली व त्या योजनेनुसार रामनवमीनिमित्य प्रकाशित होणारा हा खास अंक वाचकांच्या हाती देण्यात आम्हाला आनंद होत आहे. ऐन रामनवमीस हा अंक वाचकांच्या भेटीस येत असल्याने, व शिरडीत अष्टमीपासूनच बाबांचा उत्सव सुरू होत असल्याने उत्सव कालात हा अंक साईभक्तांच्या हातात नक्कीच असेल अशी आमची अपेक्षा आहे; आणि म्हणूनच की काय रामनवमी याच विषयावर लिहिण्याचे आम्ही ठरविले आहे.

चैत्र शुक्ल नवमी हा दिवस रामनवमी म्हणून साऱ्या भारतात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. सुमारे आठ लाख वर्षापूर्वी या तिथीस माध्यान्ही अयोध्येचा राजा दशरथ आणि राणी कौसल्या यांच्या पोटी सत्य, सदाचार आणि धैर्याचे प्रतिक मर्यादा पुरुषोत्तम भगवान रामचंद्र इक्ष्वाकु वंशात अधर्माचा नाश करण्याकरिता म्हणून आर्यावर्तात जन्मास आले आणि त्यांनी आपल्या कर्तृत्वाने सारी पृथ्वी पवित्र करून टाकली, व रामराज्याची निर्मिती केली. रामजन्मापासून तो आजपर्यंत आणि यापुढेही आमच्या भारतीय इतिहासाचा सारा गौरव 'राम' या दोन अक्षरात समाविष्ट झालेला आहे. प्रभू रामचंद्राची संपूर्ण कथा ही भारतीय साहित्याच्या उत्कर्षास सदैव प्रेरणा देणारी असून रामाचे जीवन म्हणून जगात सर्वत्र गौरविले जाते.

रामनामात अमोघ शक्ति आहे. प्रत्येक संकट प्रसंगी रामनाम् स्मरण ही संकट मुक्त करणारी सर्वात मोठी शक्ति आहे, अशी ख्याती आहे. मन आणि आत्मा यांचे शुद्धीकरण करण्याकरिता रामनाम रामबाण परिणाम घडवून आणते. आमचे गांधीजी तर रामाचे अनन्य भक्त होते. आपल्या प्रत्येक प्रार्थनेत ते रामस्मरण करीत असत. सन्मार्गाचे दर्शन या महान मंत्रामुळे होते. आत्मा व शरीर सतत निरोगी रहाते असे ते म्हणत. परलोकी गमन करतासुद्धा ते रामनामाचा जप करीतच गेले. आदिकवी महर्षि वाल्मिकीने अत्यंत रोचक शब्दात सर्व प्रथम रामायणाची रचना केली असली तरी जगातील बहुतेक सर्व भाषातून दशरथी राम, जनकसुता

वैदेही (सीता) सुमित्रा पुत्र लक्ष्मण व दशानन रावण यांच्या संबंधीच्या मानवी हृदयास चिरंतन आकर्षित करणाऱ्या आदर्श व बोधप्रद कथा लिहिलेल्या गेल्या असून त्यामधून रामनामाचा अगाध महिमा वर्णिलेला आहे.

वशिष्ट आणि विश्वामित्र यासारख्या विद्वान गुरुनी रामचंद्रांना सर्वतोपरीने शिक्षण दिले. आपल्याला अवगत असलेल्या युद्धकलेने त्यांनी अनेक दुष्ट राक्षसांचा नाश केला. रावणासारख्या महाबलाढ्य राक्षसालाही त्यांनी पाणी पाजले. ढोंगी पापी व दुष्ट अशा शूर्पणखेचे नाक कान कापून तिला हाकलून लावले. शबरीची उष्टी बोरे खाल्ली. दगड होऊन पडलेल्या अहिल्येला आपल्या पदस्पर्शाने उठविले, वानरसेनेला त्यांनी आपले मित्र बनविले आणि हनुमान उर्फ मारुती हा त्यांचा निष्ठावान भक्त, सेवक बनला. हा सारा प्रभू रामचंद्रांच्या गुणांचाच प्रताप होय.

रामनवमीच्या दिवशी प्रभु रामचंद्रांच्या गुणांचे प्रामुख्याने स्मरण केले जाते, अयोध्या, नाशिक, पंचवटी इ. ठिकाणी तर रामजन्मोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. शिरडी येथे हा दिवस अतीव उत्साहाने साजरा करतात. का तर श्रीसाईबाबा हे श्रीरामाचे अनन्य उपासक नव्हे तर रामावतार आहेत अशी भक्तांची श्रध्दा आहे. शिरडीतील रामनवमीचा उत्सव हा श्रीबाबांनी आपल्या हयातीत सुरू केला आहे व तेव्हापासून तो आजतागायत तिथे साजरा होत आहे. ठिकठिकाणच्या रामाच्या देवळातून तर होणारा उत्सव पहाण्याजोगा असतो. काही मोठ्या देवळात चैत्र शुद्ध प्रतीपदेपासून नऊ दिवस किर्तने चालू असतात. देवापुढे आरास केली जाते. काही ठिकाणी रामनवमीसच जन्मोत्सव होतो. जन्मोत्सवानंतर रात्री पालखीतून राममूर्तीची मिरवणूक काढली जाते. रामजन्मोत्सव हा जसा रामाच्या देवळांतून साजरा केला जातो. तसा विष्णूच्या देवळातून सुद्धा तो साजरा केला जातो. कारण श्रीरामाना विष्णूचा सातवा अवतार मानले जाते. जन्मोत्सव झाल्यावर प्रसाद म्हणून सर्वांस सुंठवडा, सुंठ व साखर देतात. कित्येक ठिकाणी नऊ दिवस सोहळा साजरा केल्यावर दशमीच्या दिवशी लळीत करण्याचीही रीत आहे. शिरडीला दशमीच्या दिवशी काला करण्यात येतो व हंडी फोडल्यावर होणारा कार्यक्रम तर मोठ्या धूमधडाक्याने होतो. लळीत किंवा काला झाला म्हणजे या उत्सवाची समाप्ती झाली अशी समजूत आहे.

भारतातच नव्हेतर कंबोडीया, सयाम, तिबेट इ. देशातूनही रामकथा व रामपूजेचा आज प्रसार प्रचार आहे. इतकेच नव्हे तर अमेरिकेतही रामाचा आदर्श समोर ठेवला जातो.

जळी स्थळी काष्टी पाषाणी सर्वत्र राम आहे असे आमच्या सर्व संत कवींनी वेळोवेळी वर्णिलेले आहे. संत रामदासा प्रमाणेच संत तुलसीदास हे अनन्य रामभक्त होते. हिंदीत रामायणाची रचना तुलसीदासांनीच केली. तामीळ भाषेत कंबन नावाच्या संत कवीने तुलसी प्रमाणेच स्वतंत्रपणे रामायणाची रचना केली आहे. राम हा ईश्वराचा साक्षात अवतार आहे. या दृष्टीने तुलसीने रामगाथा गायिली, त्याचप्रमाणे कंबनने सुद्धा राम हा प्रत्यक्ष परमेश्वर आहे. भूतलावरील जनतेची सुख दुःखे भोगण्यासाठी तो रामाच्या स्वरूपात प्रगट झाला अशा भावनेने रामचरित्र लिहिले आहे. ख्यातनाम राष्ट्रकवी कै. मैथिली शरण गुप्त इतके रामभक्त होते की त्यांनी रामपदकमलावर आपली काव्यधारा वाहून प्रभू रामचंद्रांच्या प्रती आपले अनन्य साधारण प्रेम व्यक्त केले आहे. हृषिकेशचे ख्यातनाम स्वामी शिवानंद महाराज यांच्या कथनानुसार रामायण ही एक अदृश्य शक्ति आहे. रामाचे स्मरण करणारा षड्रिपूवर विजय मिळवू शकतो. आपल्या एका सायंप्रार्थनेत गांधीजी म्हणतात, "रामनामाचा उच्चार करून हनुमंताने पर्वत उचलला, पत्थर सुद्धा पाण्यात तरू लागला, अहिल्येचा उद्धार झाला. तेव्हा ध्रुव, प्रल्हाद, वाल्मीकी इत्यादींशी निगडीत असलेले रामनाम मनापासून प्रत्येकाने अवश्य घ्यावे"

"साप्ताहिक गणराज्य" — श्री साईबाबा विशेषांक
संपादक – श्री. अशोक खांबेकर
एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात प्रसिद्ध होणार
शिरडी व श्री साईबाबा विषयक सर्व प्रकारचे संग्राह्य साहित्य
किंमत अवघी रु. २–५० ट. ह. सह
व्यवस्थापक :— सा. गणराज्य, बोरावके चाळ, कोपरगाव ४२३६०१
जि. अहमदनगर.

सुंदर लेख -

# श्री साई-एक अवतार

— श्री. अ. ज. चितांबर
तांबे ब्लॉक्स दिल्ली दरवाजाजवळ,
अहमदनगर.

तुका म्हणे अरे वाचाळ हो ऐका ।
अनुभवेविण नका वाव घेऊ ।। संत तुकाराम
जें प्रचीतीसी आलें खरें । तेंचि घ्यावें अत्यादरें ।
अनुभवेविण जें उत्तरे तें फलकटें जाणावीं ।। समर्थ रामदास

भारतभूमी ही ईश्वरी अवतारांची भूमि असून, अखिल जगाला आध्यात्मिकतेचा आदर्श हे ईश्वरी अवतार देत असतात. श्रीसाईबाबांच्या रूपाने ईश्वराने अवतार धारण करून ही भारतभूमि पुनीत करून सर्व जगास ईश्वरी सत्तेचा अनुभव श्रीसाई प्रत्यक्ष देत आहेत. अनुभवाशिवाय बोलणे व्यर्थ असते म्हणून संतमाहात्म्यानी अनुभवास अत्यंत महत्त्व दिले आहे. वरील अभंग आणि ओवी हे महत्त्व पटवून देतात.

'अवतार' या शब्दात मूळस्वरूपापासून खाली येऊन अवतीर्ण होते असा अर्थ ध्वनित आहे. परमेश्वर अवतार घेतो याचा अर्थ त्याच्या मूळ निराकार स्वरूपातून तो आकार धारण करून प्रगट होतो असा आहे. याचा अर्थ परमेश्वर जन्म घेतो असा नाही. त्याला जन्म नाही. तर तो स्वतःच्याच योगमायेने साकार होऊन अवतरतो.

भगवान श्रीकृष्ण अर्जुनास सांगतात :—

अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ।
प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ।। गीता

अर्थ :— मी जन्म रहित व सर्व भूतमात्रांचा ईश्वर असा अविनाशी स्वरूप असून सुद्धा, प्रकृतीला स्वाधीन ठेवून माझ्या योगमायेने मी देहधारण करून प्रकट होत असतो.

परमेश्वराचा अवतार रूपाने 'जन्म' व त्याचे 'कर्म' हे 'दिव्य' म्हणजे 'अलौकिक' आहे असे जो तत्त्वतः जाणतो तो परमेश्वराचे सत्यस्वरूप जाणू शकतो. परमेश्वराचा मायेच्या पलीकडील स्वरूपाचा परम भाव न जाणणारे मूढ लोक, परमेश्वरी अवताराला माणसाप्रमाणेच मानतात. हे त्यांचे अज्ञान होय. परमेश्वर निराकारच. पण विशिष्ट कार्याच्या उद्देशाने तो नटासारखा नटतो.

परमेश्वराच्या अवताराची भूमिका समजावून घेतल्याशिवाय श्रीसाईनाथ महाराज हे ईश्वराचे अवतार कसे हे समजू शकणार नाही. परमात्मा विशिष्ट कार्यासाठी अवतार घेतो. हे कार्य कोणते ? तर भगवान श्रीकृष्ण गीतेत सांगतात त्याप्रमाणे ... "ज्या ज्या वेळी धर्माला ग्लानि येते व अधर्माचा प्रचंड उठाव होतो व अधर्म हा धर्माला नष्ट करू पाहतो, त्या त्या वेळी मी निराकारपणा व जन्मरहितपणा याची आठवण न ठेवता त्यांनी बाजूस सारून साकार प्रगट होतो; आणि सज्जनांचे रक्षण व दुष्टांचे पारिपत्य करतो; त्यासाठी धर्माची घडी पुन्हा नीट बसविण्याकरिता निरनिराळ्या काळात मी अवतरतो." यावरून, भक्तांचा कैवार घेऊन त्यांचे दुष्टांपासून संरक्षण करणे, दुष्टांचा नाश करणे व धर्मश्रद्धा पुनः प्रस्थापित करून मानवी समाजात सात्त्विकता वाढविणे व भक्ताना तारून त्यांचा उद्धार करणे हे परमेश्वराचे अवतार कार्य असल्याचे आपणास पाहावयास मिळते.

श्रीसाईनाथ महाराज ज्या काळात प्रगट झाले त्या काळाचा आढावा घेतला तर आपणास दिसून येईल की, नास्तिकपणा फार मोठ्या प्रमाणात वाढत चालला, जागतिक अशांततेच्या काळात निराशामय जीवन जगण्याचा काळ आला, जातीजातीतील व धर्मातील अंतर वाढत चालले, कर्मठपणाला ऊत येऊन गरीबांना परमेश्वराच्या पायाजवळ जाण्याची बंदी वाढत चालली, खऱ्या अध्यात्मिकतेचा ऱ्हास होऊ लागला. अशी परिस्थिति निर्माण होऊन धार्मिक ऱ्हास होऊ लागला. अशा परिस्थितीतून आर्त, दीन दुबळ्यांना मार्ग दाखवून, त्यांची दुःखे हरण करून समाजात व सर्व धर्मीयात बंधुभाव निर्माण करून खऱ्या धर्माची पताका सर्व जगभर पसरविण्यासाठी परमेश्वराने 'श्रीसाईनाथ' हे रूप घेऊन, त्या आकारात अवतीर्ण होऊन, जगाला तर्काने न उकलणारे गूढ निर्माण केले एका अदृश्य परमशक्तीचा साक्षात्कार घडविला श्रद्धा निर्माण करून मानवांची मने प्रफुल्लित केली. सर्व धर्मातील जनाना एक महान आश्चर्यकारक नरदेह रूप दाखविले. भक्तांच्या संकटनिवारणार्थ धावून जाणे हे त्यांचे ब्रीद असून त्यांना सद्धर्माचे आचरण करावयास लावून, त्यांच्या ठिकाणची नास्तिकता पूर्णपणे नाहीशी करून, त्यांच्यात धर्माचा उदय करणे हे श्रीसाईबाबांचे अवतार-

कार्य. हे कार्य बाबा अव्याहतपणे करीत आहेत. ते नित्य, अविनाशी, सनातन, पुराण पुरुषोत्तम, शाश्वत धर्माचे संरक्षक आहेत हे भक्तांच्या अनुभवास अखंडपणे येत आहे, हे नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही. नवनवी श्रीसाईनाथांची मंदिरे अनेक ठिकाणी स्थापन होत आहेत व भक्तगण त्यांची कृपा संपादन करीत आहेत. आणखी प्रत्यक्ष पुरावा कोणता पाहिजे ?

श्रीसाईबाबांच्या जन्माविषयी तर्क वितर्क आहेत. पण हे सर्व तर्क बाबांच्यावरील श्रद्धेतूनच निर्माण होतात हे लक्षात घेणे आवश्यक आहे. आपापल्या अंतःकरणातील श्रद्धेप्रमाणे बाबांविषयी भक्त तर्क करीत असतात व त्याप्रमाणे बाबा भक्तांना दिसतात, यात आश्चर्य नाही. आश्चर्य हेच की, त्यांच्या जन्माविषयी कोणते ही अंदाज मूळ धरूच शकत नाहीत. कोणासही त्यांच्या जन्म ठिकाणाचा अगर वंश, कुल, याविषयी निश्चितपणे शोध लागलेला नाही. या ठिकाणी हेच कबूल करणे भाग आहे की,

अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् ।
परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ॥ गीता ॥

अर्थः— सर्व भूतमात्रांचा महान् ईश्वररूप असा माझा परमभाव न जाणणारे अज्ञानी जन, मानवी शरीर धारण केलेल्या मला नीट ओळखीत नाहीत. माझे अवमूल्यन करतात.

श्रीसाईनाथांचा वरदहस्त लाभलेले श्रीसंत उपासनी महाराज बाबांविषयी स्वानुभवाने काय सांगतात ते पाहा :

अजन्माद्यमेकं परब्रह्म साक्षात्
स्वयं संभवं राममेवावतीर्णम् ।
भवदर्शनात् संपुनीतः प्रभोऽहम् ।
नमामीश्वरं सद्गुरुं साईनाथम् ॥

अर्थः— जन्मरहित, आद्य, केवळ-एकच साक्षात परब्रह्म, स्वतःच स्वतःला उत्पन्न करणारा श्रीरामच अवतीर्ण होणाऱ्या प्रभो, मी आपल्या दर्शनाने पुनीत झालो असून, अशा सद्गुरु ईश्वर साईनाथांना मी नमस्कार करतो.

तसेच संतदासगणू महाराज स्वानुभवाने सांगतात.

शिरडी माझे पंढरपूर । साईबाबा रमावर ॥

अनुभवाविण असलेली भाषा ही निःसत्व असते म्हणून लेखाच्या आरंभी अनुभवाविषयीं संताची नमूद केलेली वाणी आत्यांतिक महत्वाची आहे.

निरनिराळे अवतार हे एकाच ईश्वराचे निरनिराळया स्वरूपातील अवतार होत. मग त्यांना रामकृष्ण, दत्त, शिव काहीही म्हणा.

आता आपण श्रीसाईबाबांच्या आरत्यातील वचनाचा आधार घेऊन बाबांचे रूप पाहू या. ह्या आरत्या श्रीसाईबाबा द्वारकामाईत असताना त्यांच्या प्रत्यक्ष झालेल्या आणि आजही त्याच चालू असलेल्या आहेत. बाबांनी त्या मान्य केलेल्या आहेत.

'कृष्णनाथा, दत्ता, साई । जडो चित्त तुझे पाई'।

"जयदेव, जयदेव दत्तावधूता, साई अवधुता, जोडूनि कर तवचरणी ठेवितो माता"

"भू-खेचर व्यापून योगी हृत्कमली राहसी ।
तोचि दत्तदेव तू शिरडी राहुनी पावसी"

"कलियुगी अवतार । सगुण ब्रह्मसाचार ।
अवतीर्ण झालासे । स्वामी दत्त दिगंबर ॥"

"ऐसा येई बा । साई दिगंबरा । अक्षयरूपावतारा ।
सर्वंहि व्यापक तू । श्रुतिसारा । अनुसयात्रिकुमारा येई हो ॥"

"साईरूप धर राघवोत्तमं...चिंतयाम्यहमहर्निशं मुदा ॥"

"तुज काय देऊ सावळया मी खाया तरी ।
मी दुबळी बटिक नाम्याची जाण श्रीहरी ॥"

वरील आरत्यातील वचने काय दर्शवितात ? हे साईभक्तांनी त्यांच्या हृदयातील आवाजानेच ओळखावे; व वादविवादाला नष्ट करावे ही विनंति आहे.

ही ईश्वरीलीला आहे. अपूर्व आहे. कोणत्याही धर्माचा, जातीचा मनुष्य असो श्रीसाईबाबांच्या दर्शनाला त्याला मज्जाव नाही. असेच रूप ईश्वराने धारण केले आहे. बाबांच्या पायीच सर्वोदय आहे. श्रीसाईबाबांच्या चरित्राचा अर्थ लावण्यास मानव समर्थ नाही.

अर्जुनाने विश्वरूप पाहण्यासाठी ते दाखवावे म्हणून भगवान श्रीकृष्णास प्रार्थना केली. तेव्हा श्रीकृष्ण त्यास म्हणाले, 'अर्जुना, पाहा. माझे ते विराटस्वरूप पाहा. ते मी तुला दाखवितो. अरे, पण तुझ्या ह्या सध्याच्या डोळयांनी ते तू पाहू शकणार

नाहीस. ते माझे रूप पाहण्यासाठी मी तुला दिव्यचक्षू देतो. त्या दिव्यचक्षूंच्या दृष्टीने तू मला पाहू शकशील." मग श्रीकृष्णांनी अर्जुनास दिव्य दृष्टि दिली व त्या दिव्य दृष्टीने तो भगवंताचे ते विश्वरूप पाहू लागला. तरीही तो घाबरला व तुझे ते पूर्वीचेच सौम्य रूप घे व तेच मला दाखव म्हणून त्याने भगवंतास प्रार्थना केली. श्रीसाईबाबा प्रत्यक्ष श्रीकृष्णच आहेत. त्यांनी जे रूप धारण केले त्याचे कोणत्याही धर्माच्या मनुष्याने तर्काने संशोधन केले. तरी त्यास काहीच मिळणार नाही. त्याचा आग्रहच काय तो शिल्लक राहिल. येथे एक भक्तिभावच श्रेष्ठ होय. श्रीसाईबाबांचे रूप पाहावयाचे असेल तर, निराभीमानी व्हावे लागेल. दुराचार सोडावा लागेल, दंभ सोडावा लागेल. तर्कटपणाला मूठमाती द्यावी लागेल. कोणत्याही जातीचा, धर्माचा, मनुष्याचा, प्राण्याचा द्वेष सोडून द्यावा लागेल आणि मन व बुद्धि श्रीबाबांना अर्पण करूनच त्यांच्याकडे अनन्यभावाने पाहावे लागेल. असे झाल्यासच बाबांच्या कृपाप्रसादास आपण पात्र होऊन त्यांची ओळख होऊ शकेल, त्यांची भेट होऊ शकेल.

श्रीसाई हे परमेश्वराचे अवतार कसे ? विचार करून पाहा.

### (१) बाबांचा धर्म कोणता ?

ज्याप्रमाणे नृसिंह अवतार हा मनुष्य नव्हे व पशुही नव्हे. तो स्तंभातून प्रगटला. त्याप्रमाणे श्रीसाईनाथाने रूप घेतले. कपाळी भव्य गंध, जवळच प्रदीप्त अग्निधुनी, घंटानाद, पूजोपचार इत्यादि बाह्यांगानी ते हिंदु दिसतात; तर 'अल्ला अच्छा करेगा' 'अल्ला मालिक' ह्या वाणीने व मशिदीतील निवास, कफनीवेष इत्यादींनी ते मुसलमान दिसतात. त्यांना समक्ष पाहताच पाहणारे त्यांचा स्वतःचा धर्म विसरतात आणि बाबांना शरण जातात. मानवी तर्क अपूर्ण ठरतात.

"वर्षताती स्वानंद जीवन । संततजन निववावया ।" या संत एकनाथ महाराजांच्या उक्तीप्रमाणे श्रीसाई हे जगातील सर्व धर्मवेड्या संतप्त जनांना, आपले गंभीर व कृपा दृष्टीने भरलेले स्वरूप दाखवून, स्वतःच्या स्वानंद जीवनाचा वर्षाव करून, शांत करतात. त्या धर्मवेड्या लोकांच्या हृदयातील द्वेष, मत्सर हे भाव नाहीसे करून आपल्या पायाशीं त्यांना नम्र करतात. काय हा महिमा वर्णावा ? प्रत्यक्ष ईश्वरी सत्ता आणि प्रकाश याचाच हा प्रत्यक्ष अनुभव नव्हे काय ?

याचा अर्थ हाच निघतो कीं बाबा प्रत्यक्ष परमेश्वरच असल्याने ते सर्व धर्मांचे निर्माते आहेत. त्यांना कोणचा धर्म असणार ? ते सर्व धर्मांचे रक्षकही आहेत. असे असूनही ते सर्व धर्मांच्या अतीत आहेत.

### (२) बाबांचे राहाण्याचे ठिकाण कोणते ?

ज्या ज्या वेळी, ज्या ज्या ठिकाणी भक्त असेल, त्याने बाबांचे स्मरण करताच ते तेथेच असतात. बाबा सर्व व्यापी आहेत. चराचर त्यांनी पूर्ण व्यापून टाकले आहे.

### (३) बाबांना सर्वत्र कान आहेत.

तुम्ही कोठेही हृदयातून बाबांना हाक मारा. ती बाबांना ऐकण्यास जाते.

### (४) बाबांना सर्वत्र नेत्र आहेत.

कोठेही असा. बाबा तुमच्याकडे पाहात आहेत. तुम्ही काय करता ते त्यांना समजते.

### (५) बाबांना सर्वत्र मुखे आहेत.

कोणत्याही भुकेलेल्या प्राण्याला अन्न द्या. ते बाबांना मिळते. प्राण्यांच्या रूपात भक्तांची ते परीक्षा घेत असतात.

### (६) बाबांना पूर्वजन्म आठवतात.

गीतेत म्हटल्याप्रमाणे श्रीकृष्णापूर्वीचे जन्म आठवतात. अर्जुनास नव्हे. भक्तांचे पुनर्जन्म बाबांना आठवतात. ते त्यांनी कित्येकांना सांगितले आहेत.

### (७) गजेंद्रमोक्षाप्रमाणे बाबा पशूंचाही उद्धार करतात.

बाबांनी वाघास आपल्या द्वारकामाईत मुक्ती दिली. शामसुंदर घोड्याकडून बाबांनी सेवा करून घेतली.

### (८) बाबा साक्षात् परब्रह्म आहेत.

कलियुगि अवतार । सगुण रूप साचार ।

तुमच्या श्रद्धेचे कोणतेही दैवत असो, त्या देवतेच्या ठिकाणी बाबाच दिसून ते सर्वव्यापी परमेश्वराचा दृष्टांत देतात. बाबा योगेश्वर, अवधूत आहेत.

श्री उपासनीमहाराज, मेहेरबाबा इत्यादींनाही ते सद्‌गुरु झाले. बाबा नित्य, अव्यय, सच्चिदानंदघन परमात्मा आहेत हे यावरून स्पष्ट होते. अनुभव घेणारा अनुभव घेतो.

शेवटी, सर्व सुखाचे आगर । बाप रखुमादेवीवर ।
त्याप्रमाणे शिरडी माझे पंढरपूर । साईबाबा रमावर ।
सर्व सुखाचे आगर ।

एवढेच म्हणून ही शब्द सुमनांजली श्रीसाईचरणी नम्रपणे अर्पण करतो.

## श्रीसाई मंदिर, वरळी

## रामनवमी उत्सवात श्री. पाठक साहेबांचा सत्कार

वरळीचे सुविख्यात संत श्री. मोहितेबाबा यांच्या श्रीसाई मंदिरात रामनवमी उत्सव दि. ५, ६ व ७ एप्रिल ७९ असे तीन दिवस साजरा केला जाणार आहे. दिनांक ५ रोजी रामनवमीस अभिषेक, पूजा, भजन इ. विविध कार्यक्रम पहाटेपासून दिवसभर आयोजित करण्यात येत असून दि. ६ रोजी दुपारी भंडारा व प्रसाद भोजनाचा कार्यक्रम होईल. सायंकाळी ६–३० वाजता शिरडी संस्थानचे माजी न्यायालयधारक श्री. का. सी. पाठक साहेब यांचा सत्कार केला जाईल. रात्री ९ वा. शाहीर मसुरकर व शाहीर सुखदेव कांबळी यांचा कार्यक्रम व दि. ७ रोजी रात्री ९ वा. राजभूषण कलापथकाचा ‘रूप घोड्याचं गुण गाढवाचं’ या लोकनाट्याचा कार्यक्रम होईल.

स्थळ :— बी. डी. डी. चाळ क्रमांक २९ व ३० मधील पटांगण, जांबोरी मैदान वरळी, मुंबई.

# — श्रीराम जयराम जयराम —

— श्री. द. शं. टिपणीस
वजिफदार लॉज, गोखले रोड, ठाणे

● विश्व शक्तीने चैत्र शु. ९ ला राम या नावाने मानवी देह धारण केला. श्रीरामनवमीला जन्मले. नवमीच का? कारण हा क्षय नसलेला चिरंजीव पुराण पुरुषोत्तम सदा नवाच असतो. श्रीराम जन्मले तेव्हा म्हणाले 'नवमी, मी सदोदीत नवा आहे. ताजे तवाना आहे. कधी कोमेजत नाही, सुकत नाही की गळत नाही. मला क्षय नाही.' अहो, ज्याला क्षय नाही तो सदोदीत नवाच असणार नाही का? येतो तोच मुळी नव वर्ष घेऊन, सर्वांना नव जीवन देत. पर्णहीन वृद्धासारख्या दिसणाऱ्या काटकुळया वृक्षांना नवी पालवी देत, झाडाझुडपातून नव चैतन्य फुलवीत अन्नपाण्याच्या वाटपामुळे (रेशन) मरगळलेल्या पशुपक्षांना दिलासा देत, भुकेल्या भुंग्यांना फुलांचे वाटप करीत, मधमाशांवर मधाच्या अमृताचं सिंचन करीत आम्र-वृक्षांना फुलवून फळांच्या राजाला जन्मास आणून मानवाला अमृतरस चाखायला देत, रखरखणाऱ्या उन्हात तळमळणाऱ्या पशुपक्षांदी प्राण्यांसाठी छायेच्या छत्र्या ठिकठिकाणी उघडत, वनराजाला कामास लावून त्याच्या कडून सर्व निसर्ग फुलवीत येणारा हा राम नव–मी न म्हणेल तर काय? खेळून खेळून मऊ झालेल्या (संसाराच्या खस्ता खाऊन) फुटबॉलात नव चैतन्याची हवा भरून वर्षभर संसारास व संकटांस टकरा देण्या इतपत टणक करणारा आमचा हा श्रीराम.

कृष्णाप्रमाणे रात्री अपरात्री चोरून जन्मास न येता दिवसा ढवळया भर उन्हात जन्मास येऊन जीवनाच्या उन्हाळयात होरपळून निघणाऱ्या मानवाला चंद्राचे शीतल चांदणे देण्यासाठी स्वतः वनवासातील काटेरी जीवन स्वीकारणारा हा आमचा राम दरवर्षी येऊन आम्हास सांगतो की, नव— मी, तुम्हासही करीन की, ऐकाल माझं तर. असं हे चैतन्य साकार होऊन आमच्यात आले म्हणून आम्ही आनंदाने का नाचू नये? श्रीराम जय राम जय जय राम असा त्याचा जयजयकार, त्याच्या नामात बेहोष होऊन नाचत गात टाळया पिटीत ढोल बडवीत उचात उच्च स्वरात केला तर त्यात गैर काय झाले? हो, ढोल बडविण्याच्या नादात आपण जे बोलतो त्याचा अर्थ मात्र विसरता कामा नये. ढोल पोकळ असतो. आपण मात्र पोकळ असू नये. पोकळ ढोलातून निघणाऱ्या नामाचा काय प्रभाव पडणार? रामाचा हा मंत्र काय आहे, त्यात कोणते जीवन तत्त्वज्ञान आहे हे समजून घेऊन

त्याप्रमाणे वागण्याचा आपण प्रयत्न केला नाही तर आलेला राम उलट पावली वनवासात निघून नाही का जाणार ? मग आपल्यात राम राहिला कोठून ?

श्रीराम जय राम जय जय राम असं म्हणावं उत्तम. पण म्हणता म्हणता समजले पाहिजे. समजता समजता उमगले पाहिजे व मग उमलले पाहिजे. ( आत्म-कमल ). श्री म्हणतो. श्री म्हणजे श्रीमंत. म्हणजे लक्ष्मी. श्री राम लक्ष्मी युक्तराम. पण ही लक्ष्मी बाजारपेठेतील नव्हे. ती चंचला. तिच्यावर आधार दिलात तर घसराल. श्री म्हणजे लक्ष्मी खरी. पण ती आत्मलक्ष्मी आहे. श्री राम म्हणजे आत्मलक्ष्मीयुक्त राम. आत्मशक्ति संपन्न राम. व्यक्तिची जी आत्मशक्ति ती खरी. श्री रामाजवळ ती आहे. आपल्याजवळ राम असला की ती आपल्याला खऱ्या अर्थाने वैभव प्राप्त करून देते. म्हणून श्री राम असं नित्य म्हणावे. मग आपली हाक ऐकून राम आपल्याजवळ येतो. मात्र आपली हाक रामाला ऐकू जाईल याची पूर्ण दक्षता आपण घेतली पाहिजे. भुकेल्या तान्हुल्याचे रडणे वा लहान बालकाची ' आई ' हाक ज्या तीव्र भावनेने घेते त्या भावनेने आपली हाक आली पाहिजे. असं होण्यास गाढ निष्ठा, चिकाटी, श्रम व त्याग यांची जरुरी आहे. हे सर्व असले तर श्री राम प्रसन्न होईल.

रमयन्ति इति रामःअसे म्हणतात. म्हणजे ज्यात मानव रमतो त्याला राम म्हणावे. त्याच्याशी एकरुप होण्याचा प्रयत्न करावा, नाटक व सिनेमासाठी कसे आपण व्याकूळ होऊन धावाधाव करतो अगदी तशाच व्याकुळतेने रामाला भेटण्यासाठी धावाधाव केली पाहिजे, सिनेमा पाहाण्यासाठी आपण किती अधीर होतो व पाहिला की मनाला शांति वाटते याचा अनुभव पुष्कळाना आहेच. तेच तंत्र भक्ति-तही आहे. फरक एवढाच की सिनेमामुळे मिळालेली मनःशांति क्षणैक असते तर भक्तिमुळे मिळालेली शांति चिरंजीव असते. पण हे होण्यासाठी मनाला वेसण घालणे भाग आहे. मन हे भटक्या जमातीतील आहे. ते एका ठिकाणी राहण्यास तयार नसते, फुलपाखरा प्रमाणे या फुलावरून त्या फुलावर भटकण्याचा त्याला भारी नाद आहे. नामाच्या सतत उच्चाराने मन भटकण्या पासून मागे खेचले जावून एका ठिकाणी स्थिर होण्यास मदत होते.

जय राम म्हणजे षड्विकांवर जय ताबा मिळविणारा राम, रामाने रावणाला ठार मारले, आत्मसिंहासनावर आरुढ झालेल्या अहंकाराचा नाश केला, व बिभिषणाची राम भक्तीची स्थापना केली. पण हे होण्यासाठी आधी मारुतीला ( कडकडीत वैराग्य ) लंकादहन करावे लागले. देहबुद्धि ( लंका ) म्हणजे मी देह आहे ही कल्पना

प्रथम नाहिशी झाली पाहिजे. तरच या लंकेत दबून बसलेला अहंकार नाहीसा होईल. आपल्या हृदय सिंहासनावर रावणाऐवजी आपण बिभिषणाला रामभक्तीला बसवले पाहिजे. त्याने आखून दिले ज्या मार्गाने त्याचा जय जयकार करीत वाटचाल करण्याचा कसोशीने प्रयत्न केला पाहिजे.

वैराग्याचा पुतळा, अहंकाराचा नाश करणारा, दुष्टांचा संहारक असा जो राम त्याचा जय जयकार असो. म्हणून जय जय राम.

☆

## ........ भगवन्नाम ........

—श्री. रमाकांत पंडित
प्रभास्मृति, भाऊदाजी लेन, माटुंगा, मुंबई.

● भगवन्नामाचा महिमा खरोखरच फार मोठा आहे. भगवन्नाम व संत यांचा संबंध मायलेकराप्रमाणे आहे. नामाच्या कुशीतून संत जन्माला येतात. प्रयत्न व प्रार्थना पूर्वक नामस्मरण करता करता भगवंताची कृपादृष्टी वळते व नाम साधकाच्या अंतःकरणात नामाचा दीप प्रज्वलीत होतो. एकदा का नामाची गोडी लागली की भगवन्नाम आपल्याला कधीच सोडीत नाही. जागृतावस्थेत नाम सतत घेत राहिल्याने स्वप्नावस्थेत नामस्मरण घट्ट लागते. भगवन्नामाचा उच्चार अशा जिव्हाळ्याने करावयाचा की भगवंताच्या अंतःकरणाला पीळ पडला पाहिजे. नामाच्या प्रभावाने संसारातील आपत्ती व विपत्ती नाहिशा होऊन साधकाचे योग्य असे संकल्प पूर्ण होतात. भगवंताला नाम अत्यंत प्रिय आहे इतकेच नव्हे तर त्याला नामाचा अभिमानही आहे.

भगवंताच्या नामाने एकदा का आपण जगू लागलो की आपली सर्व जबाबदारी भगवंत स्वतःवर घेतो नामस्मरण करणाऱ्या नाम साधकाना भगवंताचे सानिध्य नामरूपाने असते व वेळ प्रसंग येताच तो कुठल्याना कुठल्या तरी स्वरूपात प्रत्यक्ष प्रगट होऊन नामधारकाचे रक्षण करतो म्हणूनच मुखाने नाम हाताने काम व अंतःकरणात राम अशीच जीवनाची बैठक बसून गेली पाहिजे नामाच्या सतत अभ्यासाने वृत्ती अंतर्मुख होते व मन स्थिर होते. चित्त शांत होते व बुद्धित आत्मज्ञानाचा प्रकाश पडतो.

नामस्मरण करणाऱ्या साधकाला भगवन्नाम हा एक उत्कृष्ट मित्र आहे. जन्मभर भगवन्नाम साधकाला साथ देते. इतकेच नव्हे तर मृत्यूच्यावेळी ते नामधारकाचा त्याग करीत नाही कारण नाम रुपाने राम जवळ असतो व मृत्यूनंतरही नामसाधकाला सोडत नाही व पुढच्या जन्मात नाम साधकाला साथ देऊन अंती ते त्याला महावैकुंठापर्यंत घेऊन जाते.

कोणीहि केव्हाही कोठेही व कुठल्याहि स्थितीत नाम स्मरण करावे व आपला उद्धार करून घ्यावा असे हे गोड साधन आहे. नामस्मरण करता करता नामात आपोआप वेग येऊन त्या नामातून राम प्रगट होतो. नामाच्या पाठीमागून ध्यान ज्ञान सुख व शांति ही आपोआप येतात. नामात नमन मनन व मौन आहे प्रामाणिकपणे नित्य नामस्मरण करीत असता नामाच्या द्वारे भगवंताशी संग घडतो. जसा जसा हा संग भगवंताशी वाढू लागतो तसातसा श्रीरंग आपल्या जीवनात कसा रंग भरून राहिला आहे याची प्रचीती हळुहळू येऊ लागते.

नाम धारकाच्या अंतःकरणात नाम घेताना एकचभाव असला पाहिजे व तो म्हणजे मी देवाचा व देव माझा हा होय. मी देह नसून देवाचे रुप आहे. सच्चितानंद परमात्मा हे माझे स्वरूप आहे त्यानंतर अखंड नामस्मरणाने जी स्वानंदाची प्रचीती येते त्यामुळे वासना शक्तिचे रुपानंतर भगवद्भक्तिमध्ये होते. जीवाचे रुपांतर शिवात, अहंकाराचे ओंकारात बुद्धीचे प्रज्ञेत, चित्ताचे चैतन्यात व मनाचे उन्मनीत रुपांतर होते. स्वानंदाच्या संगतीने विकाराचेही रंग पालटतात. कामाचे रुपांतर प्रेमात क्रोधाचे शांतीत, लोभाचे वैराग्यात, मोहाचे विवेकात, मदाचे नम्रतेत व मत्सराचे आदरात होते. वासनेच्या परिवर्तनामुळे साधकाची जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्तता होते. परंतु लोकाना नामाची गोडी लागण्यासाठी नाम धारक पुन्हा पुन्हा जन्म घेतो.

भगवंताच्या हातात जसे सुदर्शन चक्र तसे भगवंताचे नाम हे नामधारकाच्या हातातील चक्र होय. नामाचे चक्र एकदा का गतिमान झाले की अमंगल, अपवित्र, व अहितकारक अशा जीवनात पाप आणि ताप निर्माण करणाऱ्या कोणत्याहि गोष्टींना नामाजवळ येऊ देत नाही.

भगवंताच्या दिव्य नामाने मनाचे उन्मन होते व बुद्धीत प्रकाश पडून जीवाला स्वतःच्या दिव्य स्वरुपाची प्रचिती येते म्हणूनच भगवंताच्या नामाचे सतत स्मरण करणे हीच खरी उपासना होय.

असा हा नामाचा नंदादीप प्रत्येकाच्या अंतःकरणात प्रभु कृपेने उजळला जावो हीच देवाजवळ प्रार्थना.

# = महान् योगी =

— श्री. गणपत गोविंद सामंत, एम्. ए.
'गुरुकुल' मुंबई–६८.

[ "महान् योगी" या लेखास प्रारंभ करण्यापूर्वी साईभक्तांस व वाचकांस नम्र विनंती की हा लेख प्रत्येकाने अभ्यासू वृत्तीने वाचावा म्हणजे लेखकाचा आशय लक्षात येईल व लेखकास सार्थक झाल्याचे वाटेल. ]

● फक्त भारतातील नव्हे तर परदेशातील सर्व रस्ते जणू श्री साईबाबांनी पवित्र केलेल्या शिरडी क्षेत्रात जात आहेत. श्रीसाई साधारण वयाच्या सोळाव्या वर्षी शिरडी गावात निंबवृक्षाखाली भक्त रक्षणार्थ आले. बाबांनी सर्व आयुष्य तेथेच लोकांच्या सुख-दुःखाशी समरस होण्यात, त्यांचे प्रश्न सोडवण्यात, उपदेश करण्यात घालवून तेथेच ते समाधिस्त झाले. शिरडीत बाबांनी अनेक चमत्कार केले, तेथील मशीदीत लोकांशी गप्पा–गोष्टी केल्या. प्रसंगानुसार तत्त्वज्ञान सांगून मार्गदर्शन केले. प्रसंगी रुद्रावतार धारण करून निसर्गावर सत्ता गाजविली.

दुष्काळी भाग, हिंदुमुस्लीम दुरावलेले संबंध निसर्गाने व मानवाने उपेक्षिलेल्या या शिरडी गावात परमेश्वराला अवतार घ्यावा लागला. मशिदीला 'द्वारकामाई' करून तेथे व चावडीत राहून लोकांमध्ये सलोखा निर्माण केला व आज आपण शिरडी व आसमंतातील कायापालट पाहतोच. मागे पडलेल्या अनेक पंचवार्षिक योजना जे करू शकल्या नाहीत ते स्थित्यंतर बाबांनी केले. आयाराम–गयाराम हे द्वंद्व बाजूस सारून निस्सिम साईभक्त निर्माण केले व आज शिरडी म्हणजे–

जैसे गाणगापुर नृसिंहवाडी ।
जैसे औदुंबर वा भिल्लवडी ।
तैसेच पवित्र गोदेचे थडी ।
क्षेत्र 'शिरडी' प्रसिद्ध ॥

तैसेचि हे योगेश्वर साई ।
महान शिरडीची पुण्याई ।
जगदुद्धाराचिये पायीं ।
गोदेठायीं अवतरले ॥

दामाजी जैसे मंगळवेढी ।
समर्थ रामदास सज्जनगडी ।
नृसिंहसरस्वती जैसे वाडी ।
तैसेचि शिरडी साईनाथ ॥
नाथांही जैसे पैठण ।
ज्ञानदेवाही आळंदी जाण ।
तैसेचि साईंनी शिरडीस्थान ।
महिमासंपन्न केले की ॥
शिरडीच आम्हा पंढरपुर ।
शिरडीच जगन्नाथ द्वारकानगर ।
शिरडीच गया काशी विश्वेशर ।
रामेश्वरही शिरडीच ॥
शिरडीच आम्हां बद्रिकेदार ।
शिरडीच नाशिक–त्र्यंबकेश्वर ।
शिरडीच उज्जयिनी महाकाळेश्वर ।
शिरडीच महाबळेश्वर गोकर्ण ॥

शिरडी क्षेत्राचे महत्त्व पटवावे तेवढे थोडेच. शिरडीवासीयांची थोर पुण्याई म्हणूनच श्रीसाई तेथे आले. सहाजिकच आहे मनुष्य स्वार्थी असतोच– म्हणून शिरडीवासीयांना श्रीसाई आपलेच वाटणे साहजिकच. जरी आज शिरडीचे श्रीसाई-बाबा असा वाक्‌प्रचार चालू असला तरी श्रीसाईमुळे शिरडी हे मान्यच करावे लागेल. शिरडीचे श्रीसाईबाबा म्हटल्यावर आणि इतर ठिकाणी श्रीसाईबाबा आहेत किंवा होते काय असा प्रश्न उभा राहतो. याला उत्तर श्रीसाई एकच व तेच 'बाबा'. जशी शिरडी म्हणजे श्रीसाई तसेच 'बाबा' म्हणजेच फक्त श्रीसाई. आज जिकडे-तिकडे अनेक 'बाबांचे' प्रस्थ असल्यामुळे वरील स्पष्टीकरण केले. 'बाबा' एकच आणि ते म्हणजे श्रीसाई. इतर बाबा मलातरी मान्य नाहीत.

फकीरी जीवन कंठणारे बाबा व दानधर्म करणारे अमीरी बाबा असा "अमीरी फकीर" होणे नाही. श्रीसाईबाबांच्या शब्दात–

मी तों केवळ भिकारी ।
फिरतों भिक्षेसी दारोदारी ।
ओली कोरडी भाजी भाकरी ।
खाऊनि गुजरीं काळ मी ॥

गरीबी अव्वल बादशाही ।
अमीरीसे लाख सवाई ।
गरीबोंका अल्लाभाई ।
अक्षयीं साई वदत की ।।
"फकीरी अव्वल बादशाही ।
फकीरीहि चिरंतन राही ।
अमीरी क्षणभंगुर पाही" ।
सदा बाबांनी म्हणावे ।।
प्रत्यक्ष संन्यासवेष यति ।
सटका तोच दंड हाती ।
'अल्ला-मालीक' वाक्यानुवृत्ति ।
भक्तप्रीति अखंड ।।

संन्यासी असून गृहस्थाश्रमी व फकीर असून अमीरी दर्शविणारे श्रीसाई म्हणजेच "श्रीमान योगी" आज प्रत्येकाचे साईमय जीवन झाले आहे व अशा-वेळी अशा या श्रीसाईस प्रत्यक्ष पहाण्याची किती उत्कट इच्छा असावी हे प्रत्येक साईभक्त ठरवो. माझा व्यक्तिशः आत्मविश्वास आहे बाबांचे शब्द फोल ठरणार नाहीत. मी श्रीसाईकडे एक शोध व बोध या दृष्टिकोनातून पाहतो.

प्रारब्ध म्हणजे बुद्धिवादातून निष्पन्न झालेला अपयशाच्या कारणमीमांसाचा युक्तिवाद माझा जरी परमेश्वरावर पूर्ण विश्वास असला तरी प्रारब्धावर बिलकूल विश्वास नाही.

परमेश्वराने, निसर्गाने, अज्ञात व अतर्क्य शक्तिमुळे किंवा अन्य कारणामुळे पहिला मानव निर्माण झाला मग हा पहिला मानव केव्हांचे प्रारब्ध घेऊन आला. माणसाची जगण्यासाठी धडपड चालू असते. त्याला कल्पना असते की आपण जन्माला येताना परतीचे तिकीट ( रिटर्न तिकीट ) घेऊन आलो आहोत. जीवनात त्याला यश-अपयश असतेच. कधी कधी अशा काही घटना घडतात की त्याचे कारण आपण सांगू शकत नाही. आयुष्यात नैराश्य निर्माण होते. नंतर तर्कवाद सुरू होऊन माणसाच्या बुद्धिवादातून युक्तिवाद निघतो आणि तेच प्रारब्ध.

ज्या घटना आयुष्यात अनपेक्षित घडतात त्याला कारण असणारच पण त्या निश्चीत प्रारब्धामुळे नव्हे. आपण निसर्गाची लेकरे आहोत व आपले जीवन ग्रहांवर अवलंबून असावे हा माझा तर्कवाद निसर्ग, ग्रह किंवा परमेश्वर यांचा ताबा आपल्या आयुष्यावर असतो व त्याप्रमाणे बऱ्यावाईट घटना आयुष्यात घडतात. ठराविक

मर्यादेपुढे आपण काही घडवू शकत नाही व अशाचवेळी निसर्ग किंवा अज्ञात शक्ति काम करते.

पिंडे पिंडे मतिर्भिन्ना ।
कुंडे कुंडे नवं पयाः ।
जातौ जातौ नवाचारा ।
नवा वाणी मुखे मुखे ॥

प्रत्येक माणसात भिन्नता असते. जात संस्कृति, सभोवतालचे वातावरण इत्यादिमुळे संस्कार होतात. त्यामुळे कुबुद्धि व सुबुद्धि कमी अधिक प्रमाणात मनावर सत्ता चालवितात.

नर नरकी करणी करे तो नरका नारायण हो जाय. हे जरी खरे असले तरी वरील गोष्टीमुळे भिन्नता निर्माण होते व आज असंख्य वाढणाऱ्या माणसामुळे- नरेचि केला हीन किती नर- असेच म्हणावे लागते.

मनुष्याच्या कर्तृत्वाची व बुद्धिवादाची मर्यादा संपल्यावर निरीश्वरवादीसुद्धा परमेश्वरास शोधतो. अशाच कडेलोटाच्या मनःस्थितीत तो अंतर्मुख बनतो तेव्हाच याला खरे 'ज्ञान' प्राप्त होते. अशात त्याला गुरु मिळाला तर

इतर देव सारे मायीक ।
गुरूचि शाश्वत देव एक ।
चरणी ठेविता विश्वास देख ।
'रेखेवरी मेख मारी' तो ॥
होणार ते होऊ द्या यथेष्ट ।
सद्‌गुरु चिंतन आपुले अभीष्ट ।
संकल्प विकल्प होतील नष्ट ।
संचित अनिष्ट टळेल ॥
इष्टानिष्ट सुखदुःख ।
संचितानुसार अमृत वा विख ।
हें प्रवाहपतित द्वंद्व देख ।
धरी न हरिख वा शोक ॥
जे जे येईल ते ते साहे ।
अल्ला मालीक वाली आहे ।
सदा तयाच्या चिंतनी राहे ।
काळजी वाहे तो सारी ॥

वरील श्रीसाईंचे उद्गार शिरोधार्य मानून व तीच शिदोरी घेऊन खडतर आयुष्याची वाटचाल केल्यास जीवन समृद्ध, संपन्न व सुखी होईल यात काय संशय ?

आपण वर्तमानपत्रात वाचतो की अमुक लेखकाने अमुक ग्रंथ लिहून सुखी जीवनाचा मार्ग व गुपित विषद केले आहे. वर्तमानपत्रातील जाहिरातीमुळे, अगोदरच निराश झालेले वाचक त्या जाहिरातीवर आकर्षिले जातात व असे ग्रंथ जणू त्यात गुपित आहे म्हणून विकत घेतात पण तो ग्रंथ वाचल्यावर निराशाच पदरी पडते. ग्रंथात नमूद केलेल्या प्रकारे आचरण ठेवता येत नाही. नेहमीच्या धाकाधुकीच्या मामल्यात ते कसे शक्य आहे ? याचा लेखक तर कधीच विचार करीत नाही पण आपल्या ग्रंथाची भरपूर प्रसिद्धि करून प्रति खपविणे हेच त्याचे ध्येय्य व ग्रंथ-काराच्या यशाचे गुपित तीच त्याची साधना. मी असे बरेच ग्रंथ वाचले व प्रत्येक खेपेस मार्ग न मिळता निराशाच वाढत गेली. ग्रंथांचा नावानिशी उल्लेख करणे रास्त नव्हे पण तात्पर्य शेकडा एकशेएक टक्के प्रसिद्ध होणारे असे झटपट ग्रंथ म्हणजे लोकांची फसवणूकच. यातून मी जो मार्ग काढला तो म्हणजे नामजप, केव्हाहि कोठेहि करता येतो. कायिक, वाचिक, मानसिक करता येतो गुरुचि आवश्यकता नाही. मात्र पूर्ण खात्री करून नाम निश्चीत करावे. नाम वारंवार बदलल्यामुळे फायदा होत नाही. साई–समर्थ, स्वामी–समर्थ, अवधूत कोठलेही नाम जपा पण एकच नाम चालू ठेवा.

धन्य नामस्मरण महती ।
गुरूही भक्त स्मरण करिती ।
ध्याता प्रवेशे ध्येयस्थिती ।
पूर्ण विस्मृति परस्परां ॥

नाम पापाचे पर्वत फोडी ।
नाम देहाचे बंधन तोडी ।
नाम दुर्वासनेच्या कोडी ।
समूळ दवडी लोटुनी ॥

नाम प्रयत्ने घेतां चोखट ।
अप्रयत्नेही नाही ओखट ।
मुखासि आले जरी अवचट ।
प्रभाव प्रकट करील ॥

नामापरीस सोपें आन ।
अंतःशुद्धीस नाही साधन ।
नाम जिव्हेचें भूषण ।
नाम पोषण परमार्थी ।

नाम घ्यावया न लगे स्नान ।
नामासि नाही विधिविधान ।
नामें सकल पाप निर्दळण ।
नाम पावन सर्वदा ॥
'साईसाई'ति नामस्मरण ।
याच मंत्राचे अनुष्ठान ।
हेंच ध्यान हेंच पुरश्चरण ।
अनन्य शरण या जावें ॥
अखंड मःझेंही नाम घेतां ।
बेडा पार होईल तत्त्वता ।
नलगे काही इतर साधनता ।
मोक्ष हाता चढेल ॥

वरील बाबांचे बोल म्हणजे यशःसिद्धी मंत्रच. कोणत्याहि विधीचें पालन न करता आत्यंतिक प्रेमाने नामाचा उच्चार केल्यास अशक्य ते काय ?

'अशक्य' हा शब्द नेपोलियनच्या कोषात नव्हता तसाच 'प्रारब्ध' हा शब्द साईभक्तांच्या कोषात नसावा. अपयश, दुःख हे प्रारब्धाचे भोग अशी सोईची समजूत करून स्वतःचे समाधान करणे यात आपल्या श्रद्धेचा पराभव आहे.

सामर्थ्य मोठे श्रद्धेचे ।
शक्य होते अशक्याचे ।
श्रद्धा नसता चराचराचे ।
शून्य मूल्य होतसे ॥

म्हणूनच—

वादावादी नाही बरी ।
नको कुणाची बरोबरी ।
नसता श्रद्धा आणि सबूरी ।
परमार्थ तिळभरी सावेना ॥
कृतयुगी 'शम-दम' ।
त्रेती 'यजन' द्वापरी 'पूजन' ।
कलियुगी 'नाम कथाकीर्तन' ।
स्वल्प साधन परमार्थ ॥
दोन हात एक माथा ।
स्थैर्य श्रद्धा अनन्यता ।
नलगे दुजे साईनाथा ।
एक कृतज्ञता ते व्हावी ॥

" श्रीसाईसच्चरित " हा दैवी ग्रंथ पदरी असल्यावर इतर शीघ्र, झटपट लिहीलेले कुडबुडे ग्रंथकाराचे ग्रंथ म्हणजे ' पी हळद आणि हो गोरी ' भक्तिमार्गात मार्गदर्शन करण्यास व्यक्ति अधिकारी हवी. संस्था काढून बुद्धिवाद्याकडून मनाची द्विधा वृत्ति करणारे ग्रंथ लिहून प्रकाशन करणे यासारखा दैवीदुर्विलास तो कोणता. सर्व रोगावर, दुःखावर एकच इलाज म्हणजे ' श्रीसाईसच्चरित ' सर्वांवर रामबाण उपाय. सुखी होण्याचे एकमेव साधन एकमेव उपचार- एकमेव गुरुमंत्र.

संकटांचा पर्वत उभा असताना व दारिद्र्य सागरात डुंबणारा खरा भक्त न डगमगता व आपल्या भक्तिला तडा न जाऊ देता सर्व संकटाना तोंड देईल. आत्मघात किंवा आत्महत्या करणे म्हणजे भ्याडपणा समजेल. त्याउलट श्रद्धा नसलेला मनुष्य अशा प्रसंगी आत्महत्या तरी करील किंवा आत्महत्येचे धारिष्ट न जुळल्यामुळे भक्तिमार्ग स्वीकारील, त्याचा हा भक्तिमार्ग म्हणजे न ईलाज म्हणून किंवा आत्महत्येचे धाडस जुळत नाही म्हणून काहीही असो शेवटी भक्तीमार्गच तारक ठरेल. या सर्वांवर मात करण्याची एकमेव गुरुकिल्ली नामजप.

साईमय शिरडीत आपण केव्हांही, कोठेही वावरू शकता. बंधन नाहीत- वडवे नाहीत- सोवळे नाही. मन स्वैर होते व प्रत्येक गोष्ट पाहताना साई चरित्रातील वर्णन व प्रसंग डोळ्यासमोर उभे राहतात. जात-गोत, वर्णभेद स्पृश्य-अस्पृश्य वगैरे भेदाभेद विरुन जातात कारण साईबाबांच्या शिरडीचे —

द्वार घराचे सदैव उघडे ।
भागवताची ध्वजा फडफडे ॥

श्री साईसच्चरितात बाबांची ' आता आपण जाऊ ते आठ वर्षाचे होऊन येऊ ' असे उद्गार लेखकाकडे काढल्याचा उल्लेख आहे. बाबांचे निस्सीम व अधिकारी भक्त कै. हरी सीताराम दीक्षित व कै. दाभोलकर सच्चरितकवि यांनी वरील ग्रंथात हे उद्गार नमूद करून त्याबद्दल त्रोटक पण सूचक भाष्य केले आहे. कै. दीक्षित यांचे बंगलोर येथील पुतणे श्री. दीक्षित यांचा एकदा साधारण १९६२ मध्ये वैयक्तिक संबंध आला. श्री. दीक्षित यांनी बाबांना पाहिले आहे. वरील उद्गाराविषयी आमचे बोलणे झाले व त्याच प्रसंगी ' मी ब्रह्म पाहिले '. नंतर समर्थ रामदास वृत्तिने लोकांचा संपर्क टाळून जंगलात राहाणारे सत्पुरुष मला भेटले. मी त्यांना गुरुसमान मानतो. जंगलात मी त्यांच्याकडे बरेच वेळा वास्तव्य केले. ते साईभक्त आहेत व वरील बाबांच्या उद्गाराविषयी त्यांनी ऊहापोह करून माझी खात्री पटविली. या महाराजांची परवानगी नसल्यामुळे मी त्यांची माहिती व इतर गोष्टी लिहू शकत नाही.

श्रीमान् योगी, महान् योगी, योगीयांचे योगी श्रीसाईबाबा यांच्या चरणी ६० व्या पुण्यतिथी निमित्त कोटि कोटि प्रणाम.

# साई उदी आणि साई तीर्थ

—श्री. आर. डी. नायक
३/बी. हरिनिवास पहिला माळा,
लेडी जमशेटजी रोड,
मुं. नं. ४०००२८

● असे सांगतात की साईबाबा शिर्डी येथील मोडकळीस आलेल्या एका मशीदीत कायमचे राहू लागले तेव्हा ते त्यांनीच ठेविलेल्या लेंडीबाग नावाच्या उद्यानातील एका विहिरीचे पाणी वापरीत असत. शिर्डी हे एक लहानसे खेडे होते व त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची टंचाई होती. त्या खेड्यात दोन विहिरी होत्या. त्यापैकी एका विहिरीचे पाणी लोक वापरीत असत, व ती लवकरच कोरडी पडत असे. दुसऱ्या विहिरीचे पाणी कडवट (मचूळ) होते, म्हणून लोक ते वापरीत नसत. परंतु श्रीबाबांनी एकदा या विहिरीत फुलें टाकिली तेव्हा पासून तिचे पाणी मचूळ होते ते अगदी पिण्यासारखे गोड झाले पण ते अपुरे असल्यामुळे श्रीबाबांचे एक निष्ठावंत भक्त श्री तात्या पाटील हे लेंडीबागेपासून दूर असलेल्या दुसऱ्या एका विहिरीचे पाणी आणून पाण्याची ही तूट भरून टाकीत असत. पुरेशा पाण्याची अशी अडचण असताही श्रीबाबा लेंडी बागेचे वर्षभर पालन करीत असत.

● श्रीबाबांनी लेंडी बागेतील विहिरीचे पाणी गोड करण्याचा जो चमत्कार केला तो कोणत्या उद्देशाने केला ते त्यावेळी तरी कोणालाही नीटसे उमगले नाही. ते केवळ एक विक्षिप्त असे फकीर म्हणूनच त्यावेळी समजले जात होते. पण थोड्याच अवधीत काही लोकांचा त्यांच्याशी निकटचा परिचय झाला व या लोकांच्या लक्षात आले की, या विहिरीचे पाणी गोड करण्यात श्रीबाबांचा हेतु फक्त बागेतील त्यांना आवडत असलेल्या फूल झाडांना पाणी घालण्याचाच नव्हता तर ते पाणी आपल्याला आंघोळीसाठी व पिण्यासाठींही वापरता यावे असा होता, व त्याप्रमाणे ते त्या विहिरीचे पाणी स्वतःच्या सर्व कामासाठी उपयोगात आणू लागले.

श्री बाबा स्वतःच त्या विहिरीचे पाणी वापरीत असलेले पाहून, काही दिवसांनी त्यांचे काही भक्तही ते पाणी बाबांच्या स्पर्शाने पवित्र झाले आहे अशा भावनेने वापरु लागले. बाबांच्या निर्वाणानंतर मात्र या विहिरीत पाणी असूनही गेली कित्येक वर्षे लोकांनी ते उपयोगात आणण्याचे सोडून ती पूर्णपणे उपेक्षित अशी राहिलेली दिसते. हे दृश्य पाहून माझ्यासारख्या शिर्डीच्या भाविक यात्रेकरूना असमाधान वाटल्याशिवाय रहात नाही. कारण त्या विहिरीचे पाणी गोड करण्यात

बाबांचा उद्देश, ते स्वतःलाच उपयोगी पडावे इतकाच मर्यादित नसून त्याचा उपयोग त्यांच्या निर्वाणानंतरही भावी पिढ्यांना सर्वप्रकारे व्हावा असाच असला पाहिजे अशी त्यांची भावना असावी.

श्रीसाईबाबांवरील माझ्या नितांत व अढळ श्रद्धेची झेप याऱ्याही पलीकडे जाऊन मला वारंवार असे वाटत असते की, लेंडीबागेतील या विहिरीतील, बाबांच्या अंगस्पर्शाने पवित्र झालेल्या पाण्याचा उपयोग शिर्डीच्या ग्रामस्थांना व यात्रेकरूना केवळ पिण्यासाठी अगर स्नानासाठीच होईल असे नाही तर बाबांच्या उदीप्रमाणे औषधासारखाही होईल. भाविकांनी हे पवित्र पाणी गंगाजलाप्रमाणे तीर्थ म्हणून थोडेसे प्राशन केल्यास अगर आपल्या शरीराच्या कोणत्याही दुखऱ्या भागावर चोळून लाविल्यास त्यांची शारीरिक अगर मानसिक व्यथा दूर होईल. अशी माझी भावना आहे व ती माझ्यासारख्या साईप्रेमिकांनाही गोड वाटल्यावाचून रहाणार नाही असा माझा विश्वास आहे.

या संदर्भात मला साईलीला मासिकाच्या जून १९७८ च्या मराठी अंकाच्या २३ व्या पृष्ठावर प्रसिद्ध झालेली एक गोष्ट सांगावीशी वाटते. १९२७ साली बेळगाव शहरात फ्लूची साथ आली होती. फ्लूपासून बचाव व्हावा म्हणून बेळगावातील बरेच लोक आनगोल आश्रमातील सिद्धारूढ स्वामींच्या शिष्या श्री कला देवीमाता यांच्या दर्शनास धावले. तेव्हा कलादेवींनी प्रत्येक रुग्णाइतास आश्रमातील श्रीहरि मंदीरात असलेल्या विहिरीतील पाण्याची एक एक लहानशी बाटली देऊन ते तीर्थ औषध म्हणून प्राशन करण्यास सांगितले; रुग्णाइतांनी माताजींच्या आज्ञेनुसार ते प्राशन केले आणि आश्चर्य असे की फ्लूने पछाडलेले सर्व लोक तेणेकरून बरे झाले. ही गोष्ट इथे सांगण्याचे कारण असे की, गंगा, गोदावरी, नर्मदा, कावेरीसारख्या नद्यांच्या व तीर्थक्षेत्रातील जलाशयांच्या पाण्याचा तीर्थ म्हणून औषधासारखा उपयोग करण्याची प्रथा नवीन नसून ती आपल्या भारतीय संस्कृतीत शतकानुशतके दृढमूल झालेली आहे त्या प्रथेचेच कलामाताजीने केलेला चमत्कार हे एक उत्कृष्ट व ताजे उदाहरण आहे; व ते लेंडीबागेतील विहिरीच्या पाण्याचा उपयोगही औषधासारखा करण्यात यावा या माझ्या सूचनेस पुष्टिदायक आहे.

माझी ही सूचना मान्य झाल्यास लेंडीबागेतील विहिरीच्या पाण्यास "साई तीर्थ" हे नामाभिधान अगदी शोभून दिसेल व ते दिल्यावर "साईउदी" प्रमाणेच "साईतीर्थ" हे नावही भक्तांच्या मुखी आदराने येत राहील या गोड विचाराने मला आनंद होत आहे.

पवित्र ठिकाणच्या अमर तीर्थक्षेत्रींच्या पाण्याचा उपयोग केवळ औषधासाठीच नव्हे तर देवादिकांच्या पूजाविधीत त्यांना अभिषेक अगर स्नान घालण्याच्या कामीही

करण्याची प्रथा आपल्या संस्कृतीत दृढमूल झालेली आहे. हे त्या पूजाविधीत कलश पूजनाचा जो मंत्र म्हटला जातो यावरूनही स्पष्ट दिसून येते. म्हणून संस्थानच्या अधिकाऱ्यांना माझी एक विनंती अशी की, ज्या लेंडीबागेतील विहिरीच्या पाण्याने श्रीबाबा आपल्या हयातीत स्वतः स्नान करीत असत ते पाणी, त्यांच्या समाधीवर सध्या दररोज जो अभिषेक घातला जातो त्यासाठी थोड्या प्रमाणात का होईना वापरण्यात आले तर ते बाबांनी लेंडीबागेतील विहिरीच्या पाण्याने केलेल्या स्नानाचे एक आनंददायक, हृदयस्पर्शी जीवंत आणि चिरस्थायी असे स्मारक होऊन त्याने अभिषेकाच्या दैनंदिन कार्यक्रमाला एक अवीट अशी गोडी निर्माण होईल यात शंका नाही; कारण अभिषेक घालताना ते घालणाऱ्या पुरोहितांना व तो पहाणाऱ्या प्रेक्षकाना "बाबा ज्या पाण्याने तुम्ही निर्वाणापूर्वी स्नान करीत होता तेच पाणी आम्ही तुमच्या अभिषेकासाठी आणले आहे" अशी भावना अभिषेकाच्या वेळी झाल्याशिवाय राहणार नाही. मी तर असेही म्हणेन की "गंगेच यमुने चैव गोदावरी सरस्वती" हा कलशपूजनाचा मंत्र जर अभिषेकाचे वेळी म्हटला जात असेल तर त्यात एखाद्या चांगल्या संस्कृतज्ञा कडून योग्य त्या शब्दात नद्यांच्या या नावाबरोबरच लेंडीबागेतील विहिरीच्या नावाचाही उल्लेख करावा, म्हणजे निर्वाणापूर्वीच्या बाबांच्या स्नानाच्या स्मृतीस तो पोषक होईल. म्हणजे बाबा लेंडी बागेतील विहिरीच्या पाण्यात आंघोळ करीत असल्याचे त्यावेळचे दृश्यच अभिषेक चालू असता आपल्या मनश्चक्षूंपुढे साक्षात आजही उभे राहील.

आता अभिषेकास लागणारे सर्वच्या सर्व पाणी या विहिरीतलेच आणावे असे माझे म्हणणे नाही कारण ते पुष्कळ असून तितके पाणी दररोज विहिरीतून काढणे इष्ट होणार नाही. म्हणून मी म्हणतो की, लेंडीबागेतील विहिरीच्या पाण्याचा एखादा लहानसा कलश आणून ते अभिषेकासाठी आणलेल्या इतर पाण्यात ओतावा म्हणजे ते सर्व पाणी पवित्र होईल व ह्या पाण्याने घातलेला अभिषेक श्रीबाबांनाही फार आवडेल अशी माझी भावना आहे.

या सूचना मी श्रीबाबांच्या प्रेरणेनेच करीत आहे असे मला वाटत आहे. पण अशा रीतीने लेंडी बागेतील विहिरीचा "साईतीर्थ" म्हणून उपयोग व नामांतर करावयाचे तर आज अस्वच्छ असलेली ती विहिर प्रथम साफ करून तिचे पाणी प्यावयास योग्य आहे असे आढळून आल्यास ती साफ करण्याच्या कामास जी अंग मेहनत लागेल ती श्रमदानाच्या रूपाने देण्यास भाविक भक्त मोठ्या संख्येने व आनंदाने पुढे येतील व ते काम म्हणजे साईबाबांची सेवा अगर पूजाच आहे अशा भावनेने करतील असा माझा दृढ विश्वास आहे.

# आईची काळजी लेकरासाठीच !

— श्री. सूर्यकांत माधवराव गर्जे
८० शिवाजी नगर, पुणे–५.

● राम नवमीचा दिवस. दुपारी १२ वा. रामाचा जन्म होणार. उत्सवाच्या तयारीला तर आमच्या पुण्याच्या साईनाथ मंदीरात सकाळपासून उधान आले होते. प्रत्येक जण आपापल्या परीने मदत करीत होता. प्रसाद जवळ जवळ तयार झाला होता. सुंठ-साखर अगोदरच मंदीरात आणून ठेवली होती. नारळ फोडून खोबऱ्याचे तुकडे करायचे काम चालू होते. भक्त मंडळी जमा होऊ लागली. श्री बाबांच्या मूर्तीला हार घालून लोक मनोभावे नमस्कार करीत होते. मंदीरासभोवती सुशोभित रांगोळी काढण्यात आली होती. श्री बाबांच्या पूजेच्या तयारीत मंदीराचे पुजारी मग्न झाले होते. मंगल वातावरणात उत्साह ओसंडून वाहत होता.

बहुतेकांना परिचित असलेली परंतु मला अपरिचित असलेली एक व्यक्ती मंदीरात आली. त्या व्यक्तीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. सावळा रंग. भव्य देह यष्टीची सहा फूट उंची असलेली. डोळ्यात सुशिक्षितपणाची झाक असलेली ती व्यक्ती म्हणजे डॉ. एस्. एस्. पिल्ले. पूर्वी ते नियमीतपणे मंदीरात येत असत. सध्या वयो-मान व व्यवसाय सांभाळून नियमीतपणे येणे जमत नाही. याबद्दल खंत वाटते, अशी तळमळ त्यांनी मला बोलून दाखविली. मंदीरात थोड्या बाजूला एका कोपऱ्यात जाऊन आम्ही दोघे गप्पा मारीत बसलो. अर्थात श्री बाबा हाच आमच्या बोल-ण्याचा विषय, हे सांगणे नको.

डॉ. पिल्ले सांगत होते– १५ वर्षापूर्वीची घटना. पावसाळ्याचे दिवस होते. संध्याकाळची वेळ होती. मी मोटर सायकलवरून एम्प्रेस गार्डनच्या बाजूने काही महत्वाच्या कामासाठी चाललो होतो. आभाळ ढगांनी भरून आले होते. आकाशात विजांचे तांडव नृत्य सुरू झाले होते. आता मुसळधार पाऊस कोसळणार म्हणून मी मोटर सायकलचा वेग थोडा वाढविला. एका वळणावर काय झाले मला समजलेच नाही. मोटर सायकलचे चाक एकाएकी घसरले. माझा फटफटीवरचा ताबा सुटला व मी रस्त्याच्या कडेला फेकला गेलो. मला थोडेसे खरचटण्यापलीकडे काहीही दुखापत झाली नाही. मला कुणी तरी अलगद झेलले होते. सुनसान रस्त्यावर एक चिटपाखरूहि दिसत नव्हते. मग मला अलगद उचलले कुणी ? माझ्या मानेखाली व कमरेखाली घातलेल्या त्या हातांचा स्पर्श अजूनही मला जाणवतो व अंगावर शहारे उभे राहतात. मी उठून उभा राहिलो. आजुबाजला पाहिले. जवळच एक

गटार तुडुंब भरून वाहात होते. मी जर त्या गटारात पडलो असतो तर... तर काय झाले असते याची कल्पना सुद्धा करवत नाही.

मी मोटर सायकल उचलली. तिचेहि फारसे नुकसान झाले नव्हते. मी घरी आलो व ताबडतोब हाडांचे तज्ञ डॉ. मोटवाणी यांच्याकडे गेलो. त्यांनी तपासले. एक्स-रे वगैरे काढला व माझे अभिनंदन करीत डॉक्टर म्हणाले– "थोडक्यात बचावलात. अर्धा इंच थोडा खाली मार लागला असता तर हाड मोडले असते व कायमचे दुखणे होऊन राहिले असते."

मी बचावलो खरा, पण मला वाचवले कुणी ? मला हलकेच उचलून धरले कुणी ?

एवढे बोलून डॉ. पिल्ले यांनी श्री बाबांना नमस्कार केला व पुढे म्हणाले– "गर्जे, बाबांची लीला अगाध आहे. साई म्हणजे लेकराची काळजी घेणारी आई आहे. माता–पिताचे प्रेम देणारे दैवत हेच स + आई–बाबा, साईबाबा होय."

☆

## श्रीसाईनाथ कालीन हयात व्यक्तींनी माहिती त्वरीत पाठवा

श्रीसाईबाबांना प्रत्यक्ष पाहिलेल्या, त्यांचे दर्शन घेतलेल्या व्यक्तींनी आपली स्वतःची माहिती व त्या सोबत एक छोटेसे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र श्रीसाईलीलाच्या—श्रीसाई हयात कालीन व्यक्ती खास अंकासाठी त्वरेने पाठवावे. हा खास अंक ऑगस्ट १९७९ मध्ये प्रकाशित होत आहे.

**पत्ता :**— संपादक श्रीसाईलीला, ८०४ बी साईनिकेतन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई ४०० ०१४.

# श्रीसाई रामांनी केलेली इच्छापूर्ती

—सौ. उषा अधिकारी
सावित्री भुवन, बंदररोड, रत्नागिरी

● चाळीस रुपये एक वार……चाळीस रुपये दोन वार लीलाववाला पुकारत होता. आता चाळीस रुपये तीन वार म्हटले की ती सुंदर शाल आपली झाली असे अनुसुयाबाईंना वाटले. एक हात छातीवर ठेऊन धडधडत्या अंतःकरणाने त्या पाहू लागल्या, तोच कोणी तरी ओरडले, "माझे पंचेचाळीस रुपये!" बिचाऱ्या अनुसुयाबाई! त्यांच्या हातापायातले त्राणच गेले, गळ्याशी आलेला हुंदका मागे रेटीत ओठ घट्ट चावीत त्या आपल्या पतीला म्हणाल्या," चलाव बाहेर आपल्याच नशिबात नाही. आता निदान भोजन घरात प्रवेश मिळतो का ते पाहू या. यशवंतराव मुलांना घेऊन मुकाट्याने बाहेर पडले व पुढे झाले. इथे मात्र त्यांचे नशीब जोरावर होते. कारण लगेच कूपन्स मिळाली व जेवणही मिळाले. पोटभर व चविष्ठ जेवण मिळाल्याचा आनंद यशवंतराव व मुलांच्या तोंडावर दिसत होता पण बिचाऱ्या अनुसुयाबाईंचे मनच कशात लागत नव्हते. जड पावलांनी त्या भक्तनिवासातील आपल्या खोलीत आल्या आणि सतरंजीवर त्यांनी अंग टाकून दिले. स्वतःच्या गतजीवनातला प्रत्येक प्रसंग त्यांचे नजरेसमोरून सरकू लागला.

तालुक्याच्या ठिकाणच्या एका गावी गरिबाघरची वेणू अनुसुया नावाने यशवंतरावांची पत्नी होऊन आली. साधी कारकूनाची नोकरी पण टाकटुकीने संसार करून गरिबीतही आनंदाने राहू लागली. संसार वाढला चार मुले झाली. पगार वाढत नव्हता पण खर्च वाढत होते. मराठी ५।६ इयत्ता शिकलेली वेणू नोकरी कसली करणार? पण बारीक सारीक कामे करुन ती आपल्या फाटक्या संसाराला ठिगळ लावत होती आणि गरिबीच्या संसारात हसतमुखाने वावरत होती. तिच्या प्रेमळ व आनंदी स्वभावामुळे कुणाकडेही जायला तिला मुभा होती. अशातच शेजारी राहणाऱ्या श्रीमंत बापूसाहेबांच्या घरी पापड करण्याच्या निमित्ताने ती गेली आणि काही ना कारणाने तिचे तेथे जाणे वाढू लागले. बापूसाहेब श्रीमंत असले तरी त्यांचा देवाधर्माकडे ओढा होता. त्यांचेकडे काही ना काही चालू असेच. एकदा त्यांचे घरी श्रीसाईसच्चरित पोथीचा सप्ताह चालू होता. बरीच मंडळी पोथी श्रवणाला येत. अनुसयाबाईही न चुकता सप्ताहात रोज हजर असत. पोथी श्रवणात त्या अगदी रंगून जात. श्रीबाबांचे भक्तांवरील प्रेम, गरिबाविषयींची कणव, त्यांची संकटसमयी

धाव घेण्याची वृत्ति, प्रत्येकाची अंतर्यामीची इच्छा ओळखून ती पूर्ण करण्याची परमेश्वरी कृपा या गोष्टी ऐकताना त्यांचे देहभान हरपे. ऐकता ऐकता त्यांच्या नेत्रांना पूर येई. ती पोथी आपल्याही घरात असावी. आपण ती स्वतः वाचून काढावी अशी त्यांना इच्छा होई. बापूसाहेब बाबांची प्रसादाची शाल पांघरून बसत. ती मोरपंखी शाल पाहिली की तशीच शाल आपणाकडे असावी असे त्यांना वाटे. बापूसाहेबांकडचा सप्ताह संपला. अवतरणिकेत सांगितल्याप्रमाणे बापूसाहेबांनी सप्ताहाचे संपूर्ण थाटामाटाने केले. सर्वांना जेवायला बोलावले. अनुसयाबाई दुसरे दिवशी सकाळीच त्यांच्या घरी गेल्या आणि त्यांच्या पत्नीला वसुंधराबाईना म्हणाल्या, "बाईसाहेब, आपली बाबांची पोथी मला देता का ? वाचीन आणि परत करीन. मुलांच्या हाताला लागू देणार नाही. अगदी जिवाभावाने तिला जपेन. अनुसयाबाईचा स्वर हळवा झाला होता. पण वसुंधराबाईना त्याचे काय ? त्या फटकन् म्हणाल्या, "छे बाई पोथी नाही हो मिळायची. आम्ही आमची पोथी घरातून कधी हलवत नाही." अनुसयाबाई इवलेसे तोंड करून घरी परतल्या होत्या.

दिवस काही तसेच राहात नाहीत. अनुसुयाबाईंचे नशीब उदयाला आले. भोळे आयोगाप्रमाणे यशवंतरावांचा पगार वाढला. फरकाची रक्कम बायकोजवळ देत ते म्हणाले, "अग, तुला चांगली दोन झुळझुळीत पातळं घे, मुलांना कपडे कर. आणखी काही वस्तु हवी तर घे." अनुसुयाबाई हसून म्हणाल्या, "हे पैसे आपण मला दिले आहेत ना ? मग ऐका माझा विचार, या पैशातून आपण शिरडीची यात्रा करून येऊ या. ४-५ दिवस रजा घ्या आणि आपण सर्व मुलांना घेऊन जाऊ. २-३ दिवस तेथे राहू. सगळे तिथले कार्यक्रम पाहू आणि मला जे काही घ्यायचय ते तिथेच घेऊ. पत्नीचा विचार यशवंतरावास पटला. एका मित्राकडून सर्व माहिती घेऊन मंडळी शिरडीत आली होती. रत्नागिरी जिल्ह्यातल्या एका गावाहून शिरडीला येताना प्रवासात खूप खर्च झाला होता. मात्र येथे आल्यावर बेताच्या भाड्याची खोली मिळाली होती. आदल्या दिवशी अभिषेक झाला होता. सत्यनारायणाची पूजा झाली होती. चारी वेळच्या आरत्या झाल्या होत्या. आता दुसऱ्या दिवशी बाबांचे प्रसादाचे वस्त्र विकत घ्यायचे आणि सायंकाळी साकुरी आश्रम बघून यायचे असे ठरले होते. पण वस्त्र घेता आले नाही. लीलावात बोलण्याची संवय नाही, आणि खिशातल्या पैशांचाही विचार करावयाला हवा होता. परतीची तिकीटे काढून व इतर खर्च धरता फक्त ४० रु. उरणार होते, त्यातच ते वस्त्र मिळाले तर घ्यायचे हा त्यांचा विचार पण तो प्रत्यक्षात आला नाही. अनुसुयाबाईंचे अश्रु आवरेनात...त्यातच त्यांचा डोळा कधी लागला ते कळले नाही. दुपारी ४ वाजले तेव्हा त्या जाग्या झाल्या. मुले व पती त्यांचीच वाट पहात होती. सर्व आटोपून ती बाहेर पडली. चहा घेऊन समाधी मंदिरात आली. अंगणातून फिरताना त्यांनी चौफेर नजर

टाकली. एका खोलीवर प्रसाद वस्त्रे विक्री येथे चालते असे लिहिलेले दिसले. त्यांच्या मनात पुन्हा आशा पालवली. बरोबर पती व मुले आहेत हे त्या विसरल्या व चटकन खोलीत शिरल्या आणि काय आश्चर्य ! त्यांना पाहिजे असलेल्या मोरपंखी रंगाची शालीची घडी तिथे टेबलावर होती. इथे लीलाव नव्हते. त्यांनी किंमत विचारली. फक्त २५ रु. किंमत ऐकताच त्यांचा आनंद गगनात मावेना. कनवटीचे २५ रु. त्यांचे पुढ्यात देऊन त्यांनी ती शाल प्रेमभराने उचलून घेऊन उराशी घट्ट धरली. त्यांचे शरीर प्रेमावेगाने गद्‌गद् हलत होते. खोलीतून धावत बाहेर येऊन हर्षातिरेकाने त्या ओरडल्या, "अहो हे पाहिलत का बाबाचं प्रसाद वस्त्र ! मला पाहिजे होतं तसं आहे अगदी. खरोखर बाबांनी आपल्या लाडक्या लेकीची हौस किती थोडक्या पैशात पुरवली बघा ! आणि एवढ्यावरच थांबलं नाही हे. माझी पोथीची हौसही माझ्याजवळ असलेल्या पैशातून मला पुरी करता येणार आहे. असं बघतां काय माझ्याकडे ? मी किती दिवस त्या पोथीचा ध्यास नाही का घेतलाय. ती आपण घेऊ या गडे विकत." हर्षनिर्भर चेहऱ्याने डंवरलेल्या आपल्या पत्नीच्या मुखाकडे यशवंतराव स्निग्ध दृष्टीने पहात म्हणाले, "अग इतर बायका दागिने आणि कपडे यांचे नुसते नाव काढले तरी नाचायला लागतात. तू अगदीच मुलखावेगळी. पण असू दे. जे घेत आहेस ते खरोखर अमोल आहे. तेच आपल्या घरात येऊ दे. म्हणजे प्रत्यक्ष बाबाच आपल्या सान्निध्यात आहेत असे वाटेल. श्रीबाबा आणि भगवान यात काय फरक आहे ? ते प्रत्यक्ष अवतारच आहेत म्हणून कुणालाही न कळलेल्या पण त्यांना एकट्यालाच कळलेल्या त्यांनी तुझ्या दोन्ही इच्छा पूर्ण केल्या आहेत. सद्‌गुरु अशीच पाठ राखू देत, अशीच कृपादृष्टी ठेऊ देत.

## सत्यवती पुरव यांचे निधन

दादर-मुंबईचे साईभक्त श्री. चंद्रकांत केसरीनाथ पुरव यांच्या ८० वर्षांच्या वयोवृद्ध मातोश्री गं. भा. सत्यवतीबाई या २६-२-७९ रोजी अल्प आजाराने अचानकपणे स्वर्गवासी झाल्या. त्या धार्मिक, व्रतवैकल्ये कडकपणे पाळणाऱ्या निष्ठावंत साईभक्त होत्या. त्यांच्या पश्चात् त्यांचे चार पुत्र, सूना, नातवंडे असा परिवार आहे. श्रीसाई मृतात्म्यास चिरशांती देवो.

# ॥ श्रीसाई भक्तिप्रभाव ॥

—श्री. पांडुरंग भुजबळ,
३७७, सोमवार पेठ, सातारा.

● मानवी जीवनात मानसिक स्वास्थ्य मिळण्यासाठी कोणता ना कोणता तरी छंद असावयास हवा त्याशिवाय मानवाची सुधारणा व शक्तीत वाढ होणार नाही. म्हणून कोणता तरी योग्य व प्रपंचाला व मनाला समाधान प्राप्त करून देणारा छंद असावयास पाहिजे. जगात निरनिराळया प्रकारचे छंद असतात. पण ज्याचे प्रारब्ध चांगले असेल व ज्याची मनधारणा प्रभावी व सत्त्वशील असेल अशा माणसास चांगला छंद लागतो व त्यापासून त्याचे तर कल्याण होतेच, इतकेच काय पण तो समाजाचेही कल्याण करू शकतो, व समाजात प्रसिद्ध पावतो. माणूस समाजात दोन मार्गाने प्रसिद्ध पावतो. एक अत्यंत नीच गोष्ट करण्याने व दुसरी अत्यंत पवित्र व प्रभावी कार्य करण्याने माणूस समाजात प्रसिद्ध पावतो. पण प्रसिद्धी मिळवणे हेच ध्येय ज्याचे नाही व ज्याला समाधान प्राप्त करून घ्यावयाचे आहे त्याला उत्तम छंद असणे अत्यंत जरूर आहे. म्हणून भक्तीचा छंद असणे हा अत्यंत प्रभावी व समाज सुधारण्याचा व कल्याणाचा छंद आहे. पण तो छंद चालू कलीयुगात सर्वांनाच प्राप्त होईल असे सांगता येत नाही. पण मानवाने सर्व सुखाला व मोहाला दूर सारले व एकच छंद भक्तीमार्गाचा ठेवण्याचा प्रयत्न केला तर ते अशक्य नाही. हा मार्ग फार संकटरुपी काट्याने भरलेला आहे. ते भयानक काटे वेळोवेळी त्याला बाजूस काढून धीमेपणाने पुढे जावयाचा जर निश्चय केला तरच हा भक्ती प्रभावाचा छंद माणसास साध्य होईल अन्यथा ही फार अवघड गोष्ट आहे. माणसाने भक्ती-प्रभाव प्राप्त होण्यासाठी निरनिराळया प्रार्थनास्थानाकडे जावयास पाहिजे, मग ती कोणत्याही समाजाची असोत. सर्वांचा परमेश्वर एकच आहे ही भावना ठेवून व जबर श्रद्धा ठेवून त्याचे आश्रयास जावयास पाहिजे. माणसास त्यायोगे मनःशांती प्राप्त होईल. देवळात अगर प्रार्थनागृहात आपण ह्या पवित्र ठिकाणी जाताना आपण पादत्राणे बाहेर ठेवून व हातपाय स्वच्छ करून जातो पण मन स्वच्छ करण्याचा प्रयत्न करीत नाही. तरी मानवाने नुसती बाह्य स्वच्छता करण्याचा प्रयत्न तर करावाच पण अहंकार देखील बाहेर ठेवून अशा पवित्र ठिकाणी जावे म्हणजे मनःशांती प्राप्त होईल, आणि ही मनःशांती मिळणे हाच भक्तीमार्ग आहे.

मानवाचा सुधारणेचा रथ दोन चाकावर चालतो. एका चाकाचे नाव कायदा व दुसऱ्या चाकाचे नाव नैतिक संस्कार, नैतिक संस्कार न करता व मनाची पवित्र घडण शिस्तीत न करता नुसता कायदा करून मनाची सुधारणा करू पहाणे म्हणजे सुधार-

णेचा रथ एकाच चाकावर अक्षरशः फरफटत ओढत नेण्याप्रमाणे आहे. मनाची घडण व जडण ही पवित्र तत्त्वावर भक्तीचे मार्गाने झाली पाहिजे. त्याशिवाय लौकिक बंधने, कायदे फोल आहेत. नुसती दारूबंदी, जुगारबंदी, मटकाबंदी करून उपयोग नाही. प्रत्येक मानवाची मनःशक्ती उच्च व पवित्र मार्गाने व परिणामाचा विचार करून होईल त्याच वेळी भक्तीचा प्रभाव दिसेल व त्यामुळे मग ह्या सर्व बंदया यशस्वी होतील नाहीतर हा सर्व फाफट पसारा होईल व लाभ काहीच दिसणार नाही. माणसाचे मन व शरीर निरोगी होण्याकरीता माणसाने बौद्धिक दृष्टया लठ्ठ होण्यापेक्षा मनाने पवित्र होऊन शरीर घट्ट करावयास पाहिजे आणि स्वतःचे व देशाचे कल्याण होण्याकरिता माणसाने भ्रष्ट न होता सुष्ट व्हावयास पाहिजे. ह्या करिता मनाचा तोल राखून माणसाने आपला जो विरोधी आहे त्याचे नुसतेच अवगुण लक्षात ठेवणे म्हणजे चांगले जीवन जगणे नव्हे तर विरोधी व नीतीभ्रष्ट, भ्रामक समजुतीवर आधारलेल्या माणसाचे चांगले गुण लक्षात घेणे व त्या गुणाची कदर करणे म्हणजे जीवनशास्त्र समजून घेणे. श्री सदगुरु साईबाबांनी आपली पवित्र तत्त्वे अमलात आणण्याची पराकाष्ठा केली. सर्वांचा कडकडून विरोध, निंदा, नालस्ती सर्व सहन केली पण त्यांनी आपल्या भक्ती प्रभावाने व पवित्र तत्त्वांनी सर्व विरोधीं माणसांना जास्तीत जास्त प्रभावी तर केलेच व आपले कायमचे भक्त केले ही साधी गोष्ट नाही. त्यांनी निव्वळ विरोधाला विरोध तर केला नाहीच, पण श्रीसाईबाबासारख्या पवित्र पुरुषावर सुवर्णाचा व पैशाचा वर्षाव होत असताना त्याने त्याकडे ढुंकूनही पाहिले नाही. उलट आपल्या जवळ जेवढे होते तेवढे ते सर्व वाटून टाकत. उद्याचा विचार त्यांनी कधीच केला नाही. दुजाभाव दाखवला नाही. म्हणून मानवाने भगवंताच्या अनुसंधानात रहावे आणि जो भगवंताशी व श्रीसाईबाबांशी एकनिष्ठ राहीला, त्यांनी कालावर सत्ता गाजवली. अशा लोकांना मरणाचे भय नसते. ज्यांनी श्रीसाईबाबांना सर्वस्व दिल्यामुळे त्यांना वासना उरली नाही, आणि म्हणून जेथे वासना उरली नाही अशा भक्तावर काळाचाही शिरकाव झाला नाही व होत नाही. म्हणून भक्ती-मार्ग एकनिष्ठ श्रीसाईसेवा हाच ह्या जगातून यशस्वी प्रवास करण्याचा मार्ग आहे. भक्ती हे महान शक्तीपीठ आहे, व म्हणून ज्याचा पवित्र भक्तीयुक्त आत्मा ब्रह्मांशी एकरूप झालेला आहे त्याला प्राप्त झालेली मनःशांती शब्दातीत आहे. अखंड व एकनिष्ठ भक्तीने प्रत्येकाने आपले नशीब घडवावे. हे नशीब परमेश्वर घडवीत नाही. परमेश्वर फक्त तुमच्या प्रयत्नात मार्ग दाखवतो, व त्याची कृपा झाली तर मग नशीब कोठे तरी पळून जाते. म्हणून मानवाने सदाचार, श्रद्धा, तळमळ ठेवून भक्ती केली तर कृपा होतेच. कृपा करण्यापूर्वी परमेश्वर तुमची कळकळ पहातो. तो तुमच्या भक्तीचा बाह्य भपका पहात नाही. देखावा तर, तर त्याला नकोच असतो म्हणून मानवाने कळवळून प्रार्थना व भक्ती करावी, म्हणजे त्याचा प्रभाव काय असतो हे पहावे. आपले हृदय नेहमी स्वच्छ, पवित्र व नामस्मरणाने युक्त असे ठेवावे, म्हणजे भक्तीचा प्रभाव

कसा पडतो ते दिसेल आणि म्हणूनच श्रीसाईबाबांनी आपल्या भक्तांना संदेश दिला की, "जो जो मज भजे जैसा जैसा भावे तैसा तैसा पावे, मी भक्ताशी." आणि हा त्यांचा पवित्र संदेश आज ही खरा होत आहे. आणि पुढेही खराच होईल ही माझी मनाची धारणा आहे.

आपल्या कार्यात ईश्वरी शक्तीचे अधिष्ठान असल्याशिवाय आपले कार्य सिद्धीस जात नाही ही त्रिवार सत्य गोष्ट आहे. म्हणून आपण आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करून ईश्वर ठेवील त्या स्थितीत समाधान मानले पाहिजे व इतरांच्या वैभवाकडे प्रेमाने पाहिले पाहिजे. आपण दुसऱ्याची निंदा, मत्सर व द्वेष न ठेवता ह्या जगात वावर करावा हीच भक्तीची परिसीमा होय हाच भक्तीयोग.

☆

# मुंबई-शिरडीतील श्रीरामनवमी उत्सव

● सर्व साईभक्तांना कळविण्यात येते की यंदा शिरडी येथे श्रीरामनवमी महोत्सव बुधवार दि. ४ एप्रिल १९७९ ते शुक्रवार दिनांक ६ एप्रिल १९७९ पर्यंत नेहमीप्रमाणे थाटाने साजरा केला जाईल. सर्व, साईभक्तांनी हेच निमंत्रण समजून महोत्सवास हजर राहून संस्थानला शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वतोपरीने सहकार्य द्यावे ही विनंती. नेहमीप्रमाणे श्री. अनंतराव आठवले यांची किर्तन प्रवचने होणार असून अनेक गायक भक्त मंडळी आपापली हजेरी लावणार आहेत.

● संस्थानच्या 'साईनिकेतन', डॉ. आंबेडकर मार्ग, दादर येथल्या कार्यालयातही गुरुवार दि. ५ एप्रिल रोजी रामनवमी उत्सव साजरा केला जाईल व दुपारी १२ वा. आरती व प्रसादाचा कार्यक्रम होईल. ततपूर्वी गायन, भजन प्रवचन इ. कार्यक्रम होतीलच.

जब

# केवटसे केवटने चरण धुलवाये

—डॉ. अनिल जायस्वाल
द्वारा श्रीसाई क्लिनिक, चितारओळ नागपूर–२
पिन : ४४०००२

श्रीराम पधारें आगे आगे
लक्ष्मण भाई पीछे पीछे
बीचमें चलत है सीतामाता
ब्रह्म जीव बीच माया समान ।।
मैं भयो केवट, नैय्या–खिवैय्या ।
साँई है राखो मुझे मँझधारा ।।
जासु नाम सुमिरत एकही बारा
उतरहिं जाय जीव भवसिंधु अपारा ।।
मैं केवट पतवार सम्हाले ।
साँई हमारे केवट प्यारे ।।
पालनकर्ता राखन हारे ।
विघ्न सभीके सदाही टारे ।।
भोर–सपनमें अब्दुला आयो ।
'साँई–सेवक'ने डाँट सुनायो ।।

"काहें धरे तू व्यर्थ अभिमान ?
अंतरात्मा की आवाज पहचान ।।
मन औ, आत्मा के संघर्ष को जान ।।
अंतरात्मा की पुकार को ही तू मान ।।
साँई–राम–रहीम रखवाले ।
येशू–ख्रिस्त–गुरूनानक हमारें ।।
वेंकटेश या वेंकुंशा प्यारे ।
कभी न छोडे अल्ला मँझधारे ।।
मूरख–अग्यानी 'अनिल' भयो !
क्या किसी चंचल,
मतवाली, बलखाती,
पागल कुतियाने
तुझे भी डस लियो ?
या अपने भ्रमपूर्ण
लुभावने प्रेमजालमें
मोहवश ही क्यों न हो;
क्या तुझे भी फांस लियो ?
शायद इसी वजहसे तूं
उस पवित्र–महान आत्मा को
अल्लासाँई, मौलासाँई के बजाय
समकक्षही मान रहा है।
क्यों तूं उस परवर दिगार को
केवल केवट कह कर रहा पुकार ?
खुदाको खुदके बराबरही
रहा है मान ?
देख !
देखतो सही
यही तो है वह द्वारकामाई
जहाँ तू भी कभी कभार
कुछ पलोकें लियेही सही
आश्रय पाता है।
श्रीसाँईनाथ की
शुभ्र छबि निहारता है।
सांसारिक दुःख दर्दों को भूल
पवित्र धुनी के समीप
बैठक, ढोंग रचाता है।
लेकिन,
हरवक्त, हरक्षण, हरदमही मैं

उसी माताकी सेवा में
कार्यरत रहता हूं ।
मशिद द्वारका को
झाड्र लगा कर,
बुहारकर फुहारकर
सजाता हूं ।
साईं–समर्थ की बैठक
सुशोभित करता हूं ।
आत्मानंद के दीप
सदैव जलाता हूं !
साँईं । हमारे मालीक सरकार
भवसागर से तारे पार
सब जीवों के परवर दिगार
खुदको भलेही, समझ केवट
तूं पडा रहे मँझधार ।
"अल्लाहं–मालिक" खुदाको
केवट की उपमा देकर
तूं पाप का न बन भागीदार
इसिलिये पाता दुःख अपार ! "

* * * *

यह था मात्र स्वप्न–दृष्टांत
या थी कोरी कल्पना
इसका जरा भी न मुझको ध्यान
फिर करू मैं क्यों व्यर्थ अभिमान !
न माना मेरा दिल
सद्सद विवेक बुद्धी की
कली रही है खिल
फिरभी पापी–हृदयको
मेरे रही है, वो छिल !
मैं नैय्याखेवनहार हूं,
लोगोंको, गंगापार करवाता हूं ।
माँझी हूं
केवट हूं

लेकिन शिर्डी के साईंबाबा
भलेही देवाधिदेव क्यों न हो ।
समाधी मंदिर के सिंहासनापर विरजित
क्यों न हो ।
भक्त गणों के आदरणिय पूज्यनिय हो ।
प्रभु समान वे उन्हे झुलारतें हो ।
अभिषेक या पूजादि विधी भी करते हो ।
वे ही साक्षात ईश्वर श्रीसांईं
मेरी निगाहोंमें तो केवल महान
केवट समही है ।
जो सब जीवोंको,
दिन–दुःखियोंको,
रूग्ण–जनोंको,
किसी तिन्हाइतोंद्वारा
जिन्हे हम मात्र केवट ही समझते हैं;
संसार सागर से पार कराते है ।
हर श्रद्धालुकों भवसागर से तारते हैं ॥
इसिलिये तो कहता हूं
मैं भी केवट हूं
साँईंभी केवट है महान

● ● ●

सुना है मैंने
श्रीरामने शिलारूपी
अहल्या को उद्धारा ।
तत्समही श्रीसाँईं ने शिलारूपी
इस जीव को उद्धारा ।
एक नाचीज को उभारा ।
पंगु को गिरीवर चढाया ।
नास्तिक को आस्तिक बनाया ॥
साँईं–स्वयं जिसपर विराजे
आखिरकारं वह तो पूजनीय ही है ।
वही शिला अभीभी
पवित्रतासे ओतप्रोत–सुशोभित
द्वारकामाईमें स्थापित है ।

● ● ● ●

इस केवट की नौकापर भी
श्रीरामसाँई कभी संवारे थे !
वनवास लेते वक्त उन्हाने
गंगापार करवाई थी।
साथमें सीतामाता औ, लछमन भी थे।
श्रीरामसाँई के दक्षिण चरण की सेवा
उनके बंधु के अधिकारमें थी।
और वाम चरण की सेवाका अधिकार
था सीतामाता को ही।
लेकीन,
लेकिन मैं भाग्यशाली हूं
और उनका शुक्रगुजारभी हूं;
कि इस नाचीज केवटकी नैय्यापरही
विराजनेसे पहले
श्रीराम-साँई केवट ने
गंगाजलसे स्वयम के
दोनों श्री चरण
इस अधम केवट को
पखारने का मौका दिया।
जिन चरननी चरन पादुका
समाधी-मंदिर में रखवाई ।।
सोई चरन केवट
धोय लिन्हे तब
हरी नाव चलाई ।।
भज मन श्रीरामसाँई चरण सुखदाई।
केवटसे केवटनेही श्रीचरण धुलाई ।।

* * *


दि. २० ते २७ मार्च नागपूर-विदर्भ दौरा

"श्री साईबाबा संस्थान शिरडी" च्या सौजन्याने



श्री साईबाबांचे
तेजस्वी जीवन रंगभूमीवर
कुमारसेन गुप्ते
साईभक्तांसह सादर करीत आहेत
"आरती थिएटर्स" (मुंबई) निर्मित

शिरडीचे श्री साईबाबा

लेखक/दिग्दर्शक : किरण ढुधाळकर • नेपथ्य : दत्ता चौडणाकर
• निर्माता/संगीत : कुमारसेन गुप्ते

सार्वजनिक संस्थाना खास सवलत
शतक महोत्सवाकडे
यशस्वी वाटचाल

संपर्क : कुमारसेन गुप्ते
१४ पितांबर लेन, माहीम, मुं. १६.
फोन : ४५ ६५ ४१

# साईभक्तांना निमंत्रण

स. न. वि. वि.

प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीचा श्रीरामनवमी उत्सव दि. ४–४–७९ ते ६–४–७९ अखेर (बुधवार ते शुक्रवार अखेर) तीन दिवस श्रीक्षेत्र शिर्डी येथे साजरा होणार आहे.

आपले कुटुंबीय व स्नेही मंडळींसह आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

उत्सवातील महत्त्वाचे कार्यक्रम खालीलप्रमाणे आयोजित केले आहेत.

## दि. ४-४-७९ बुधवार

सकाळी ५–१५ श्रींची काकड आरती.

६–०० श्रींचे फोटोची व पोथीची मिरवणूक व द्वारकामाईत स्थापना.

६–३० श्रीसाईचरित्र अखंड पारायण सुरुवात.

६–३० बाबांचे मंगलस्नान व गायन वादन.

८–०० सामुदाईक अभिषेक.

८–०० श्रींच्या वस्त्रांची प्रसाद रूपाने जाहीर लिलावाने विक्री.

१२–०० माध्यान्ह आरती व तीर्थ प्रसाद.

४–३० ह. भ. प. श्री. अनंतराव आठवले महाराज यांचे कीर्तन.

६–४५ धूपारती.

७–३० ते ९–३० कलाकारांची हजेरी.

९–१५ श्रींच्या पालखीची मिरवणूक.

११-०० शेजारती.

## दि. ५-४-७९ गुरुवार (रामनवमी)

सकाळी ५-१५ श्रींची काकड आरती.

६–०० श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक, श्रीद्वारकामाईतून समाधि मंदिराकडे.

६–३० कावडींची मिरवणूक व श्रींचे मंगलस्नान.

८–०० श्रींच्या वस्त्रांची प्रसाद रूपाने जाहीर लिलावाने विक्री.

८–३० सामुदाईक अभिषेक.

सकाळी ११–०० ह. भ. प. श्री. अनंतराव आठवले महाराज यांचे रामजन्मानिमित्त कीर्तन.

१२–३० माध्यान्ह आरती व तीर्थ प्रसाद.

५–१५ निशाणांची मिरवणूक.

६–०० श्रींच्या रथाची मिरवणूक.

६–४५ धूपारती.

९–१५ गुरुवारची पालखी.

१०–०० कलाकारांची हजेरी.

भक्तांना दर्शनासाठी मंदिर रात्रभर उघडे राहील.

## दि. ६-४-७९ (शुक्रवार)

सकाळी ६–०० बाबांचे मंगलस्नान.

७-३० गुरुस्थान येथे रुद्राभिषेक.

८–०० सामुदाईक अभिषेक.

८–०० श्रीं च्या वस्त्रांची प्रसाद रूपाने जाहीर लिलावाने विक्री.

११–०० ह. भ. प. श्री अनंतराव आठवले महाराज यांचे गोपाल काल्याचे कीर्तन व दहीहंडी कार्यक्रम.

१२–३० माध्यान्ह आरती व तीर्थ प्रसाद.

६–४५ धूपारती.

७–३० कलाकारांची हजेरी.

१०–०० शेजारती.

सोई प्रमाणे कार्यक्रमात फेरबदल करण्यात येईल.

आपला,

**क. ही. काकरे**

कोर्ट रिसिव्हर श्री साईबाबा संस्थान, शिरडी.

## —❀ साई पूजा ❀—

पूजा करावी तुझी साईनाथा ॥
तूं दीनाचा आश्रयदाता ।
तूं भक्तांची स्फूर्तिदेवता ।
तूं अपंगांचा रक्षणकर्ता ।
तूं सर्वांचा जीवनदाता ।
पूजा करावी तुझी साईनाथा ॥ १ ॥

पाहता तुझे लोचन
शांत होई माझे मन ।
वाटे मज नेईल तारुन
हा माझा साईनाथ ।
पूजा करावी तुझी साईनाथा ॥ २ ॥

मूर्ति पाहता तुझी मंदिरी ।
अश्रु दाटले लोचनी ।
निघता निरोप घेऊनी ।
मन येते गहिंवरुनी ।
पूजा करावी तुझी साईनाथा ॥ ३ ॥

— सौ. वैशाली आनंद हिंदळेकर
ओ/२०९, इंडियन ऑईल नगर,
अंधेरी (पश्चिम), मुं. ४०० ०५८

# ॥ चरणी ठेवितो माथा ॥

कृपा जाहली सद्गुरु नाथा । ठेवितो माथा ।
चरणी ठेवितो माथा । तुमच्या ठेवितो माथा ।

तेजस्वी नयनांतूनी तुमच्या
भाव मधूर हरक्षणास दिसती ।

तुम्ही दाखवुनी साईलीला
कृतार्थ केले भक्ता

म्हणूनी ठेवितो माथा । चरणी ठेवितो माथा ।
आम्ही ठेवितो माथा ॥

भक्तसंकटी तुमचा पडता ।
भक्तासाठी धावत येता ।

अशीच राहो कृपा प्रभू तुझी
अमुच्या ठायी सदा । चरणी ठेवितो माथा ।
आम्ही ठेवितो माथा ॥

स्नेहदृष्टी तव अशीच राहो ।
कृपादृष्टीने सदैव पाहो ।

संकटांचे हरण होवो ।
साईनाम घेता ।

आमुच्या नामसुखी आणता । चरणी ठेवितो माथा ।
आम्ही ठेवितो माथा ॥

—श्री. रामचंद्र गणेश गुप्ते,
रामनगर, डोंबिवली (पूर्व)

# आस

शिर्डीच्या साईसंता, मम आस तुझी रे भगवंता ॥धृ॥
सत्याची वाट दे, दूर पळों कुव्यसनें
घडो काम चांगले, पापांपासुनि जपणे
चरणांशी तुझ्या आलो आतां ॥१॥

भक्तीचा मार्ग दे, प्रेमळ मन हें राहो
ह्या नयना कडुनि, कर्म चांगले पाहो
सदैव सुगुण दे, गुणवंता ॥२॥

मुखी नाम तुझे दे, ध्यानी असो तव मुर्ती
मनीं भाव घडो रे, कानीं ऐको तव किर्ती
" ऋषि " हा विनवी, अनंता ॥३॥

* * *

# तिर्थ

शिर्डीच्या साई तुझ्या दर्शनाला आलो
घेवुनि दर्शन आम्ही, भाग्यवंत झालो रे ॥धृ॥
अनेकांच्या तोंडी होती ऐकीली किर्ती
घरोघरी पाहिली, तव दिव्य मुर्ती
प्रत्यक्षांत तुज भेटता, आनंदात न्हालो रे ॥१॥

शिर्डीस पावन केले, येवूनी तू बाबा
आम्हा वाटे काशी येथे गुरुद्वार काबा
पाहूनि तुझे हे तिर्थ, पुण्यवंत झालो रे ॥२॥

फकीर तूं बाबा कैसी कमालच केली
अनेकांच्या मनांमध्ये धमालच केली
" ऋषि "च्या संगे आम्ही, दर्शनाला आलो रे ॥३॥

— श्री. रमेश शंकरराव भावसार
६, लक्ष्मीपुरा, देवास (म. प्र.)

# श्रीसाईबाबांचे वर्णन

दिव्यमुख दोन हात
तया माझा प्रणिपात
काखे झोळी जवळी श्वान
नित्य गोदावरीचे स्नान
माथा शोभे शुभ्र वस्त्र
अंगी कफनी घोळदार
चिलीम सटका टमरेल हाती
पायी चढाव वाजती
राजा म्हणे साईनाथा
तव पदी माझा माथा

× × ×

**साईकृपा :—**

हेचि कृपा ठेवा साई
तुझा विसर न व्हावा
गुण गायीन सर्व तुझे
हेचि माझे असे गोडी
नलगे मुक्ती धन संपदा
तुझाच संग देई सदा
राजा म्हणे शिरडी वासी
सुखी ठेवावे भक्तासी

—श्री. एन. आर. देशपांडे
येल्लारेडी, जि. निझामाबाद


आमचा मे १९७९ चा अंक

**श्रीसाईदरबार विशेषांक**

श्रीबाबांच्या विषयीच्या माहितीने खच्चून भरलेला हा अंक वाचा व अवश्य संग्रही ठेवाच.

# श्री बाबांची प्रभावी उदी

लाविता भाळी उदी
सरीती रोग व्याधी
मुखात घालीता उदी
आम्यास लाभे शांती
मनात वसे साईमूर्ती
उदी रुपाने आशीर्वाद देशी
संकटास धावे माऊली साई
दुःख-संकटात असता भक्त
त्यासी रक्षी साईदत्त
देह ठेवूनी श्रीकृष्ण मंदिरी
तीच आपुली पवित्र समाधी
जरी देह ठेविला आपला मंदीरात
तरी साक्षात उभे ठाकतां भक्तांच्या दारात
सदैव वाही काळजी आम्हा भक्तांची
चिंता का करावी आम्ही अभाग्यांनी
हीच विनंती आपुल्या चरणांशी
श्री दत्त साई सेवकांची
बांधवले श्रीकृष्णमंदीर शिरडी ग्रामी
त्यात पहुडले आपण घेऊनी समाधी
परी हाक ऐकूनी धावती भक्तांचे संकटी,
धावूनी येती समाधीतूनी
अशी असे बाबांची पवित्र समाधी
अखंड प्रज्वलीत असे देव-अग्नी
तिच पवित्र द्वारकामाई
सदैव हात आपुला असावा आमच्या शिरी
हिच विनंती करतो बाळकृष्ण सेवक साईदत्त
आपुल्या चरणी !

—श्री. बाळकृष्ण शामराव गोरक्षकर
६/७४ पाठारे प्रभू धर्मशाळा, सोनापूर लेन
मुंबई-४०० ००२

# शिरडी-वृत्त-माहे फेब्रुवारी सन १९७९

या महिन्यात साईदर्शनासाठी बाहेरगावच्या भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती पुढीलप्रमाणे :—

**कीर्तन** :- १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशीशास्त्री यांची कीर्तने एकादशी व महत्त्वाचे दिवशी झाली. २) ह. भ. प. छगनमहाराज बारटक्के नांदेड यांचे कीर्तन झाले.

**भजन, गायन, वादन** वगैरे —(१) श्री. कर्सनलाल र्व्हे. भावसार, मालेगाव (२) श्री स्टार्स ऑफ मेलडी. मेंपुरा, पुणे. ३) श्री. बाळासाहेब माळवदकर पुणे. ४) श्री. दामुअण्णा म. दळवी श्रीरामपूर. ५) श्री. अशोक दा. दळवी श्रीरामपूर. ६) श्री. प्रभाकर देशपांडे श्रीरामपूर. ७) श्रीमती पुष्पलता अ. शिं मुंबई ८) श्री. मधुकर वऱ्हाडकर, मुंबई. ९) श्री. मोतीलाल सं. पवार नासिक १०) श्री. अमरेंद्र मोहनलाल न्यू दिल्ली. ११) सौ. गौरी रॉय न्यू दिल्ली. १२) सौ. कमलिनी पं. आठवले मुंबई. १३) सौ. नलिनीताई जोशी डोंबिवली. १४) कु. नीला स्वादी डोंबिवली. १५) सौ. शैलजा पटवर्धन डोंबिवली. १६) नवजवान ब्रास बॅण्ड मनमाड. १७) श्री. के. व्ही. गोपालकृष्ण आंध्र प्रदेश. १८) नवयुग गायन पार्टी नागपूर. १९) श्री. नारायण ग. मोघे अलाहाबाद. २०) श्री ओंकारनाथ रयना दिल्ली. २१) कु. विजया पाटील मुंबई. २२) श्री. किरण क. कांकरिया शिरडी. २३) श्री. दिलीप गुगले अहमदनगर.

**महाशिवरात्री कार्यक्रम** :— महाशिवरात्रीच्या दिवशी श्रींच्या दर्शनासाठी भक्तांची फार गर्दी झाली होती. रात्री ७-३० ते ९पर्यंत कीर्तनाचा कार्यक्रम झाल्यावर ९-१५ ते ११ पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून फिरून आली. त्यानंतर शेजारती झाली.

## माननीयांच्या भेटी :—

१) मा. श्री. के. बी. जितकर, IAS जिल्हाधिकारी अहमदनगर.
२) मा. श्री. एन. के. पारेख, जज्ज, सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई.
३) मा. श्री. डि. एम. पंत, रिटायर्ड आय. जी. पी. अहमदाबाद.
४) मा. श्री. आर. तिवारी, जिल्हाधिकारी बुलढाणा.
५) मा. श्री. ॐप्रकाश गहरोत्रा IAS मुख्य का. अ. जि. परिषद अ. नगर

६) मा. श्री. आळतेकर IAS ॲडिशनल कलेक्टर पुणे.

७) मा. श्री. तोरस्कर, इ. ज. ऑफ प्रिझन्स, महाराष्ट्र.

८) मा. श्री. वर्मा, कस्टम कलेक्टर मुंबई

९) मा. श्री. स्वरूप, कमिशनर नाशिक

१०) मा. श्री. मनुभाई डॉक्टर, सॉलीसिटर मुंबई.

११) मा. श्री. पद्मनाभय्या, IAS सेल्स टॅक्स कमिशनर मुंबई

१२) मा. श्री. राणे सेक्रेटरी व चीफ इंजिनिअर बी. ॲण्ड सी. महाराष्ट्र.

१३) मा. श्री. शिंदे डे. डायरेक्टर ॲण्ड ॲडि. कमिशनर महाराष्ट्र.

१४) मा. श्री. बी. एन. आडारकर चेअरमन, स्टेट ट्रान्सपोर्ट महाराष्ट्र.

१५) मा. श्री. मिश्रा, चेअरमन म. राज्य विद्युत मंडळ मुंबई.

१६) मा. श्री. शिवाजीराव पाटील अ. नगरनिवासी, उप जिल्हाधिकारी.

१७) मा. श्री. एल. एम. सुखवाणी, डे. सेक्रटरी, दिल्ली.

**हवापाणी** :— शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटे हवेत गारवा असतो. थोड्या प्रमाणात पाऊसही झाला.

# शिरडी समाधी मंदिरातील

श्रीसाईबाबांच्या नयनरम्य मूर्ती स्थापनेला यंदा पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्य श्रीसाई मूर्तीचे शिल्पकार कै. वसंतराव तालीम यांचे शिल्पकार पुत्र श्री. हरीश तालीम यांची वाचण्यासारखी मुलाखत मे ७९ च्या अंकात.

# शिरडीत नेत्रदान शिबिर झाले

● श्री साईबाबा संस्थान शिरडी, लायन्स क्लब कोपरगाव मुंबई व विलेपारले (पूर्व) आणि दि रॉयल कॉमनवेल्थ सोसायटी फॉर दी ब्लाईंड यांच्या सहकार्याने शिरडी येथे एक भव्य नेत्रदान शिबिर शनिवार ता. २४-३-७९ ते ३१-३-७९ या सप्ताहात प्रथमच आयोजित करण्यात येऊन ते यशस्वीरित्या पार पडले. यासाठी श्री साईबाबा संस्थानने प्रामुख्याने पुढाकार घेऊन आपल्या साईनाथ रुग्णालयातर्फे सर्व रुग्णाइतांची निवास, भोजन व उपचार इ.ची सर्व ती सोय विनामूल्य केली. या शिबिरासाठी मुंबई लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. इंदूभाई पटेल, सुविख्यात नेत्रशस्त्रक्रियातज्ञ डॉ. भालचंद्र डी. तेलंग, डॉ. अरुणकुमार शिवलकर, डॉ. आपटे, डॉ. जोबनपुत्रा इ. तज्ञ मंडळी आली होती; व त्यांनी ता. २४ रोजी सुमारे ४०० वर रोग्यांना तपासून त्यांचेवर यशस्वी उपाय/इलाज केले. सुमारे २०० नेत्ररुग्णावर डॉ. तेलंग व इतर सहकारी डॉक्टर्स यांनी ता. २५ व २६ रोजी शस्त्रक्रिया केल्या.

रविवार ता. २५ रोजी येथे झालेल्या भव्य समारंभात प्रमुख पाहुणे श्री क. ही. काकरे कोर्टरिसिव्हर श्री साईबाबा संस्थान यांनी केलेल्या भाषणात शिबिराच्या सुरुवातीपासूनची सर्व ती हकीगत सांगून ज्यांनी ज्यांनी या शिबिरासाठी यत्न केले त्या सर्वांचे हार्दीक आभार मानले. या समारंभात लायन्स क्लब प्रेसिडेंट विलेपारलेचे श्री. ठाणावाला, श्री. दिगंबर रावजी कोते सरपंच शिरडी, श्री. प्रभाकर बोरावके लायन्स क्लब अध्यक्ष कोपरगाव, साईट कॉनझरव्हेशन अधिकारी व कार्यकर्ते श्री. महेंद्रभाई शहा, श्री. विजयकुमार बोरावके तसेच संस्थानचे श्री. काकरेसाहेब, ऑफिस सुपरिटेंडेंट श्री. पाठक, श्री. अवधूतराव शिंदे, श्री. मोदी, डॉ. देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला. विशेषतः संस्थानचे डॉ. देशपांडे यांनी रुग्णाइतांची पूर्वीच नोंदणी करून त्यांचे डोळ्यावर खरोखरीच इलाज करावयास हवा की काय याची पूर्व तपासणी करून ठेवली होती व त्यामुळे आलेल्या डॉक्टर मंडळींना पुढील सर्व प्रकारचे कार्य सुलभ करून ठेवले होते याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावे तितके थोडेच. शिबिराला सौ. पद्मावेन शहा यांनी २००१ रु. व महेंद्र शहांच्या आईकडून २०१ रु. व ५०१ रु.च्या देणग्या आल्या.

* * *

# श्रीसाईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

## श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | | रु. पै. |
|---|---|---|
| (१) | श्रीसाई सच्चरित्र, (मराठी) | १६–०० |
| (२) | श्रीसाई सच्चरित्र, (इंग्रजी) | ६–२५ |
| (३) | श्रीसाई सच्चरित्र, (गुजराती) | ६–५० |
| (४) | श्रीसाई सच्चरित्र, (हिन्दी) | ७–५० |
| (५) | श्रीसाई सच्चरित्र, (कानडी) | ८–०० |
| (६) | श्रीसाई सच्चरित्र, (सिंधी) | १०–०० |
| (७) | गुजराती पोथी (शरणानंद) | ५–५० |
| (८) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (मराठी) | ०–३० |
| (९) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (गुजराती) | ०–३० |
| (१०) | दासगणूकृत ४ अध्याय, (मराठी) | ०–८० |
| (११) | सगुणोपासना, (मराठी) | ०–३० |
| (१२) | सगुणोपासना, (गुजराती) | ०–२५ |
| (१३) | श्रीप्रधानकृत चरित्र, (इंग्रजी) | २–०० |
| (१४) | साईलीलामृत, (मराठी) | ५–०० |
| (१५) | सचित्र साईबाबा, (चित्रमय संग्रह) | २–०० |
| (१६) | साईबाबा अवतारकार्य, (अ. य. धोंड) | ३–०० |
| (१७) | शिर्डीचे श्रीसाईबाबा, (के. भ. गव्हाणकर) | ५–०० |
| (१८) | शिर्डी दर्शन (६६ चित्रांचा संग्रह) | ४–५० |
| (१९) | मुलांचे साईबाबा, (मराठी) | १–२५ |
| (२०) | मुलांचे साईबाबा, (गुजराथी) | १–०० |
| (२१) | चिल्ड्रेन्स साईबाबा, (इंग्रजी) | १–५० |
| (२२) | मुलांचे साईबाबा (तेलगु) | १–५० |
| (२३) | बच्चोंके साईबाबा ( हिंदी ) सदानंद चेंदवणकर | १–०० |
| (२४) | साई किर्तनमाला, (मराठी) | १–२५ |
| (२५) | साई दी सुपरमन, ले. स्वामी साई शरणानंद, (इंग्रजी) | १–२५ |
| (२६) | श्रीसाई रूद्राध्याय, (मराठी) | ०–०५ |
| (२७) | श्रीसाई गीतांजली, (मराठी) | ०–०५ |
| (२८) | गाईड टु शिर्डी, (इंग्रजी) | ०–१० |
| (२९) | श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र, ( मराठी व इंग्रजी ) | |
| | वार्षिक वर्गणी, | ६–०० |
| | प्रत्येक प्रत | ०–६० |